- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे


**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

**सोने-चांदी**
✔ २४ कॅरेट : १,४८,७०० /-
✔ २३ कॅरेट : १,४६,३५० /-
✔ चांदी : २,३८,३००/-

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, २४ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २२५ | किंमत : २ रूपये

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# पेपरफुटी रोखण्यासाठी कायदा आणणार, फास्ट ट्रॅक कोर्ट आणि कठोर शिक्षेची तरतूद : नरेंद्र मोदी



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकाळी एक ट्वीट केलं होतं. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक व्हिडिओ जारी केला आहे. या व्हिडिओच्या माध्यमातून मोदींनी फास्ट ट्रॅक कोर्टासंदर्भात माहिती दिली.
मित्रांनो, मला माहिती आहे, पेपर लीक ही किरकोळ विषय नाही, लाखो विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी खूप त्रासदायक आहे. त्यामुळं पेपर लीक घटनेनंतर आतापर्यंत गेल्या अडीच महिन्यात अनेक पावलं टाकण्यात आली. गुन्हेगारांना पकडण्यात आलं, ते तुरुंगात आहेत. आपली महत्त्वाची जबाबदारी होती, विद्यार्थ्यांचं वर्ष वाया जाऊ नये, तात्काळ परीक्षा घेण्याची गरज होती. सरकारनं सर्व शक्तीचा वापर करत २२ लाख विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे आयोजन केलं. पाच सहा दिवसांपूर्वी १९ तारखेला निकाल देखील आला.
देशात पास झालेल्या विद्यार्थ्यांच्या आनंदाच्या बातम्या देखील आल्या. आम्ही त्यामध्ये समाधान माननारे लोक नाही, मी आज फास्ट ट्रॅक कोटार्साठी विभागांना आदेश दिले होते. विभागानं दिवसभर मेहनत करुन रात्री मला मसुदा दिला आहे. फास्ट ट्रक कोर्ट आणि कठोर शिक्षेचा मसुदा त्यावर कॅबिनेटमध्ये चर्चा होईल, तिथं अंतिम चर्चा होईल. सोमवारपासून संसद अधिवेशनाचा दुसरा आठवडा येईल, त्यावेळी लवकरात लवकर ते बील पास करण्याचा प्रयत्न केला जाईल, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

## विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास उडाला

**नवी दिल्ली :** देशभरातील हजारो विद्यार्थी सध्या रस्त्यावर उतरले असून जंतर-मंतर, इंडिया-गेट आणि देशाच्या विविध भागांत तीव्र आंदोलने छेडत आहेत. नीट-युजी परीक्षेतील गोंधळ आणि जंतरमंतरवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या कारवाईचा निषेध या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. विद्यार्थ्यांचा सध्याच्या व्यवस्थेवरील विश्वास पूर्णपणे उडाला असून तो पुन्हा संपादन करण्यासाठी सरकारने केवळ सिस्टिमवर अवलंबून न राहता विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे अशी मागणी प्रियांका गांधी यांनी केली आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियाद्वारे नीट पेपरफुटी प्रकरणाशी संबंधित खटल्यांचा जलद निपटारा करण्यासाठी फास्ट-ट्रॅक न्यायालये स्थापन करण्याची घोषणा केली होती. या घोषणेनंतर पत्रकारांशी बोलताना प्रियंका गांधी यांनी केवळ विद्यमान व्यवस्थेच्या चौकटीत राहून या समस्येवर तोडगा निघू शकत नाही, असे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांचा सध्याच्या व्यवस्थेवरील विश्वास पूर्णपणे उडाला असून तो पुन्हा संपादन करण्यासाठी सरकारने केवळ सिस्टिमवर अवलंबून न राहता विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्यासोबतच दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

**पोलिस कारवाईवर अनेक प्रश्नचिन्हे**
यावेळी प्रियंका गांधी यांनी आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस कारवाईवरही गंभीर प्रश्न उपस्थित केले. जर सरकार विद्यार्थ्यांच्या भविष्याबाबत खरोखरच गंभीर असेल, तर आंदोलक विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज का करण्यात आला आणि अश्रुधूराचा वापर का झाला, असा थेट सवाल त्यांनी विचारला. सध्या हजारो विद्यार्थी रस्त्यावर उतरले असून सरकारने त्यांच्या भावना समजून घेऊन त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधावा असेही त्या म्हणाल्या.

**थोडक्यात**

## देशातील साखरेचा साठा संपतोय?

**नवी दिल्ली :** गेल्या महिनाभरामध्ये सारखेच्या कारखान्यामधील मूळ किमतीमध्ये सुमारे १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे बाजारात साखरेची टंचाई निर्माण होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. त्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय साखर व्यापार संघाने स्पष्टीकरण दिले असून देशात साखरेचा पुरेसा साठा असल्याचे सांगितले आहे.
देशात साखरेची टंचाई निर्माण होणार असल्याच्या वर्तवण्यात येत असलेल्या शक्यतांच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय साखर व्यापार संघाने साखरेची किंमत वाढणार असल्याचे करण्यात येत असलेले दावे निराधार आहेत, असे सांगितले आहे. तसेच मागच्या महिनाभरात साखरेच्या कारखान्यातील मूळ किमतीमध्ये सुमारे १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र याचा अर्थ देशामध्ये साखरेचा पुरवठा कमी झाला आहे, असा होत नाही, असे स्पष्ट केले आहे. अखिल भारतीय साखर व्यापार संघाचे चेअरमन प्रफुल्ल विठलानी यांनी सांगितले की, हल्लीच साखरेच्या कारखान्यातील मूळ किमतीत जी तेजी आली आहे त्यामुळे साखरेची टंचाई निर्माण होणार असल्याचे वातावरण बाजारात तयार झाले आहे. मात्र अशी कुठलीही परिस्थिती नाही असेही त्यांनी सांगितले.




## सर्वोच्च न्यायालयाकडून सोनमचा जामीन रद्द

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
इंदूरच्या राजा रघुवंशी हत्या प्रकरणातील आरोपी पत्नी सोनम रघुवंशीला सर्वोच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. न्यायालयाने तिचा जामीन रद्द करत येत्या ३ आठवड्यांत सरेंडर करण्याचे आदेश दिले आहेत. मेघालय सरकारने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला. राजा रघुवंशीच्या हत्या प्रकरणात आरोपी पत्नी सोनमला मिळालेल्या जामिनाविरोधात मेघालय सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती.
सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, या प्रकरणाचा खटला पुढील ६ महिन्यांत पूर्ण करण्यात यावा. जर ६ महिन्यांत खटला पूर्ण झाला नाही, तर सोनम पुन्हा जामिनासाठी अर्ज करू शकते. यासोबतच न्यायालयाने तिला ३ आठवड्यांच्या आत सरेंडर करण्याचे निर्देश दिले आहेत. मेघालय उच्च न्यायालयाने ३० जून रोजी सोनमला कनिष्ठ न्यायालयाने मंजूर केलेला जामीन कायम ठेवला होता. या निर्णयाविरोधात मेघालय सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते.
मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने सोनमच्या वकिलाला दोन पर्याय देत विचारले होते की, सोनम स्वतःहून सरेंडर करणार की न्यायालयाने तिच्या जामीन रद्द करण्यावर निर्णय द्यावा? दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या आपल्या उत्तरात सोनमने स्वतःला निर्दोष असल्याचे सांगत मला या खोट्या गुन्ह्यात अडकवण्यात आल्याचा दावा केला होता. तिच्याविरोधातील संपूर्ण प्रकरण हे केवळ परिस्थितिजन्य पुराव्यांवर आधारित आहे, त्यामुळे फक्त आरोपांच्या आधारे तिला दोषी मानले जाऊ शकत नाही, असा युक्तिवाद तिच्या वकिलांनी केला होता.



**सोनम फरार होऊ शकते**
मेघालय सरकारच्या वतीने बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, कागदपत्रांमध्ये केवळ एका कलमाचा क्रमांक टाइप करताना चूक झाली होती. एवढ्या छोट्या तांत्रिक चुकीच्या आधारावर जामीन दिला जाऊ शकत नाही. जर जामीन कायम राहिला, तर सोनम फरार होण्याची दाट शक्यता आहे असा युक्तिवादही तुषार मेहता यांनी केला.

## टेकऑफनंतर ब्रिटिश एअरवेजचे तीन वैमानिक आजारी

**हैदराबाद :** विमानाने टेकऑफ केल्यानंतर ब्रिटिश एअरवेजचे तीन वैमानिक आजारी पडल्याने हैदराबाद ते लंडन प्रवासादरम्यान आपत्कालीन परिस्थिती उद्भवली. एका वैमानिकाला ऑक्सिजन देण्यात आला. मात्र अन्य दोघांची प्रकृती अस्वस्थ असतानाही आपले कर्तव्य पार पाडत त्यांनी गंतव्यस्थानी विमान सुखरुप पोहचवले. लंडनमधील विमानतळावर उतरताच वैमानिकांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेनंतर ब्रिटिश एअरवेजने चौकशी सुरू केली आहे.
ही घटना ब्रिटिश एअरवेजच्या बीए२७६ या विमानाशी संबंधित आहे. हैदराबाद येथील मुक्कामानंतर ब्रिटिश एअरवेजचे विमान हैदराबादहून लंडनला रवाना झाले. प्रवासादरम्यान विमान ३० हजार फूट उंचीवर असताना एका वैमानिकाची प्रकृती गंभीररित्या बिघडली. विमानात असतानाच त्याला ऑक्सिजन देण्यात आला. इतर दोन वैमानिकांनाही आजारपणाची लक्षणे जाणवू लागली. तरीही त्यांनी आपले कर्तव्य पार पाडत विमान लंडनमध्ये सुखरूप पोहचवले. ब्रिटिश एअरवेजने एक निवेदन जारी केले आहे. आमच्या सहकाऱ्यांचे आरोग्य आणि कल्याण ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. आजारपणाच्या काही तुरळक घटनांनंतर आम्ही या ठिकाणच्या कर्मचारी निवासाची समीक्षा करत आहोत असे निवेदनात म्हटले आहे. प्राथमिक अहवालांनुसार, उड्डाणापूर्वी हैदराबादमधील हॉटेलमध्ये या तिन्ही वैमानिकांनी एकत्र नाश्ता केला होता. तसेच, त्यांनी एका बा कंपनीने पुरवलेले बाटलीबंद पाणीही प्यायले होते.

## ३ सख्ख्या बहिणींनी रचला एकाच तरुणाशी विवाह

**वृत्तसंस्था, अमरोहा**
काही महिन्यांपूर्वी दोन जुळ्या बहिणींनी एकाच तरुणाशी लग्न केल्याचा व्हीडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता. ती घटना ताजी असतानाच आता चक्क तीन सख्ख्या बहिणींनी एकाच तरुणासोबत लग्न केल्याची अजब आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यात घडलेल्या या प्रकाराचा व्हीडीओ इंटरनेटवर तुफान व्हायरल होत असून यावरून जोरदार वाद पेटला आहे.
अमरोहा जिल्ह्यातील हसनपूर विधानसभा क्षेत्रातील धोरिया गावात राहणाऱ्या रमेश (व्यवसायाने शेतकरी) यांच्या सरोज, सावित्री आणि संतोष या तीन मुलींनी एकाच तरुणासोबत विवाहबद्ध होत सोशल मीडियावर रील अपलोड केली आहे. चामुंडा मंदिरातील हवन कुंडासमोर अग्नीला साक्षी मानून त्यांनी सात फेरे घेतले आणि एकमेकींच्या उपस्थितीत सिंदूर भरून उपस्थितांच्या पाया पडून आशीर्वाद घेतले.



**लग्न खोटे नाही, अगदी खरेच**
बुधवारी अपलोड झालेल्या या व्हीडीओनंतर सोशल मीडियावर अनेक नेटकऱ्यांनी ही केवळ पब्लिसिटी स्टंट किंवा रील असावी असा संशय व्यक्त केला. मात्र, या संशयाला पूर्णविराम देत तिन्ही बहिणींनी आणि त्या तरुणाने अजून एक नवा व्हीडीओ पोस्ट करत हे लग्न १००% खरे असल्याचा दावा केला. या दाव्यानंतर सोशल मीडियावर हिंदुत्ववादी संघटना आणि स्थानिक नागरिकांमधून प्रचंड संतापाची लाट उसळली आहे.
या संपूर्ण प्रकरणात एका नव्या वादाला तोंड फुटले आहे. व्हीडीओमध्ये हसनपूर नगरपालिकेचे भाजप अध्यक्ष (चेअरमन) या तिन्ही बहिणींसोबत आणि वरासोबत उपस्थित असल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यांच्या उपस्थितीवर नेटकऱ्यांनी कडक शब्दांत ताशेरे ओढले आहेत. दुसरीकडे, चामुंडा मंदिराच्या पुजाऱ्यांनी या घटनेवर तीव्र आक्षेप घेत मंदिराच्या आवारात असा कोणताही विवाह सोहळा पार पडला नसल्याचे स्पष्ट केले आहे.


# शेती, शेतरस्त्याच्या भांडणात आता नोटीस थेट ई-मेलवर!

- आदेश न मानल्यास मिळणार 'मोफत' पोलिस संरक्षण
- महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा मोठा निर्णय
- गृह आणि महसूल विभागाचा संयुक्तपणे पुढाकार
- मामलतदार न्यायालयात ऐतिहासिक सुधारणा
- शेतकऱ्यांना अडवणाऱ्या दंडेलीखोरांना चाप बसणार

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
ग्रामीण भागातील शेती, शेतरस्ते, वहिवाट किंवा पाण्याचे प्रवाह अडवणाऱ्या दंडेलीखोरांना चाप लावण्यासाठी राज्य शासनाने अत्यंत कठोर आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने महसूल विभागाने मामलतदार न्यायालय कायद्यात महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. या नव्या नियमांनुसार प्रकरणातील सुनावणीसाठी नोटीस थेट ई-मेलवर बजावली जाणार असून, तहसिलदारांचा (मामलतदार) आदेश न मानणाऱ्या अतिक्रमणदारांविरुद्ध बाधित शेतकऱ्याला मोफत पोलिस संरक्षण देणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबतचे परिपत्रक आज जारी करण्यात आले.
अनेकदा नोटीस मिळाली नाही किंवा टाळाटाळ केली, असे कारण सांगून शेतरस्त्याचे विवाद ताटकळत ठेवले जात असत. यावर तोडगा म्हणून मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ मध्ये नवीन 'कलम १४-अ' समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार आता महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील नियमांसोबतच ई-मेलद्वारे नोटीस पाठवून अर्धन्यायीक सुनावणीची प्रक्रिया अत्यंत वेगाने पूर्ण केली जाईल. याबाबतचा अध्यादेश आज ( दि. २३ जुलै ) रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे.

**आदेश डावलल्यास 'मोफत पोलिस बंदोबस्त'**
तहसीलदारांनी रस्ता मोकळा करण्याचा किंवा मनाई हुकूम देवूनही जर अतिक्रमणदार शेतकरी त्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करत असेल, तर बाधित शेतकऱ्याची अडचण दूर करण्यासाठी 'कलम २१ (५)' समाविष्ट करण्यात आले आहे. यापुढे तहसीलदार आपल्या आदेशातच "सदर आदेशाचे पालन करण्यास अतिक्रमणधारकाने कसूर केल्यास व बाधित व्यक्तीने पोलिसांकडे अर्ज केल्यास, त्याला कलम २१ (५) नुसार मोफत पोलिस सुरक्षा पुरवण्यात यावे." असे स्पष्ट करतील.
पोलिस यंत्रणेला कडक सूचना तहसीलदारांच्या आदेशात मोफत पोलिस सुरक्षेचा स्पष्ट उल्लेख राहून गेला, तरी केवळ या तांत्रिक कारणावरून बाधित शेतकऱ्याला सुरक्षेपासून वंचित ठेवता येणार नाही, अशी स्पष्ट दक्षता घेण्याचे निर्देश गृह विभागामार्फत सर्व पोलिस ठाण्यांना देण्यात आले आहेत. पुणे विभागीय आयुक्तांच्या समितीच्या शिफारशीनुसार महसूल व गृह विभागाने संयुक्त पुढाकार घेऊन हा अध्यादेश पारीत करण्यात आला आहे.

## सदोष दारुगोळ्यामुळे ६२.१० कोटी रुपयांचे नुकसान



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
संसदेच्या लोकलेखा समितीने (पीएसी) पुन्हा एकदा संरक्षण मंत्रालयाला फटकारले आहे. अठराव्या लोकसभेतील पीएसीच्या ४९ व्या अहवालामध्ये बडमाल येथील दारुगोळा निर्मिती कारखान्यातून लष्कराला पुरवण्यात आलेल्या सदोष दारुगोळयाच्या पुरवठ्यामधून झालेले ६२.१० कोटी रुपयांचे नुकसान उघडकीस आणले आहे. सोबतच तोफखान्यासाठीच्या तोफांच्या खरेदीस झालेला अनेक वर्षांचा उशीर हा लष्कराच्या ऑपरेशनल तयारीसाठी मोठा धोका असल्याचेही या अहवालामध्ये नमूक करण्यात आले आहे.
धनुष तोफेसारख्या स्वदेशी प्रकल्पाच्या उत्पादनात येत असलेल्या अडचणींबाबतही समितीने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. तसेच इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये सुधारणा, स्किल डेव्हलपमेंट, उत्तम निर्णय प्रक्रिया आणि नियोजित वेळेत उत्पादन अशा पाच प्रमुख शिफारशी केल्या आहेत. या अहवालामधून आत्मनिर्भर भारतासमोरील संरक्षण क्षेत्रातील लक्ष्य गाठण्यासाठी समोर असलेल्या आव्हानांना समोर आणण्यात आले आहे.
पीएसीने बडमाल येथील दारुगोळा निर्मिती कारखान्यातून पुरवठा करण्यात आलेल्या सदोष दारुगोळ्याला बदलण्यावर खर्च झालेले ६२.१० कोटी रुपयांचं नुकसान ही गंभीर बाब असल्याचे म्हटले आहे. अशा त्रुटींमुळे केवळ पैसे वाया जात नाहीत तर लष्कराकडील दारुगोळ्याच्या साठ्याच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होते. दरम्यान असे प्रकार टाळण्यासाठी संरक्षण मंत्रालयाने पुरवठा साखळीला कठोर एसओपी आणि कालमर्यादेसोबत मजबूत करावे अशी सूचनाही पीएसीने केली आहे.

संपादकीय लेखणीतून...

## झुरळांचं ऐका

दिल्लीतील जंतरमंतरवर नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ शांततेत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठीमार केला, अश्रुधुराचा वापर केला आणि अनेक विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले. या कारवाईत अनेक विद्यार्थी जखमी झाले. आपल्या भविष्याची चिंता व्यक्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना गुन्हेगारांसारखी वागणूक देणे, हे कोणत्याही लोकशाहीला शोभणारे नाही. नीट पेपरफुटीने देशातील लाखो विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास उडाला आहे. अनेक विद्यार्थ्यांनी वर्षानुवर्षे मेहनत घेतली, पालकांनी खस्ता खात पैसे खर्च केले, विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे अभ्यास केला पण, पेपरफुटीमुळे त्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले. त्यामुळे विद्यार्थी न्याय मागण्यासाठी रस्त्यावर उतरले होते, यात गैर ते काय? नीट पेपरफुटी आणि परीक्षा व्यवस्थेतील गोंधळामुळे अनेक विद्यार्थी प्रचंड मानसिक तणावाखाली आले, काही विद्यार्थ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. अशा घटनांमुळे संपूर्ण देश हादरला.

सरकारला प्रश्न विचारण्यासाठी अनेक विद्यार्थी आंदोलनात सहभागी झाले. ते शांततेत आपली बाजू मांडत होते. त्यांच्याकडे शस्त्रे नव्हती, ते दगडफेक करत नव्हते, ते फक्त आपल्या भविष्याबद्दल प्रश्न विचारत होते. पण त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी त्यांच्यावर लाठ्या-काठ्या चालवल्या गेल्या. हा प्रकार म्हणजे केवळ विद्यार्थ्यांवरचा हल्ला नव्हता तर लोकशाहीतील आवाज दाबण्याचा प्रयत्न होता. लोकशाहीत सरकारने जनतेचे प्रश्न ऐकले पाहिजेत. आंदोलन, उपोषण आणि निषेध हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत सरकारची असंवेदनशीलता पराकोटीला गेल्याचे दिसून आले. त्यामुळे माजलेल्या सत्ताधाऱ्यांची मुजोरी मोडून काढणे ही काळाची गरज बनली आहे. देशाचे भविष्य घडवणा-या सुशिक्षित तरुणाईला जर अमानुष व अन्याय वागणूक मिळत असेल तर अशा सत्ताधाऱ्यांना सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही. सत्ताधाऱ्यांचा अहंकार वाढला असून आता तो मोडीत काढण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही. ते काम विरोधक आणि तरुणाईलाच करावे लागेल.

आजचे सत्ताधारी 'मन की बात' करण्यातच मग्न आहेत. त्यांना जन की बात ऐकावी असे वाटतच नाही. असे आत्ममग्न सरकार शेतकरी, कामगार, मजूर, महिला आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधायला तयार नाही. ना खाऊंगा, ना खाने दूँगा, अशी भीष्मप्रतिज्ञा करणारेच भ्रष्टाचाऱ्यांना पाठिशी घालताना दिसत आहेत. विरोधी पक्ष फोडण्याचे संविधानविरोधी कृत्य करण्यात सत्ताधाऱ्यांना विशेष रस आहे. शिक्षण क्षेत्र, एपस्टिन फाईल व अर्थव्यवस्था यात बदनाम झालेल्या मंत्र्यांवर पांघरूण घालण्याचे सत्कार्य आजचे सरकार करत आहे. महाराष्ट्रातील तरुण शिक्षणातील अन्यायाविरुद्ध लढा देत आहेत. चांगले शिक्षण घेऊनही नोकरीच्या संधी नाहीत, बेरोजगार तरुणांची संख्या वाढत चालली आहे. पण सरकारला याच्याशी काही देणे- घेणे नाही. एका प्रसंगी सरन्यायाधीशांनी बेरोजगार तरुणांची झुरळे अशी निर्भत्सना केली आणि झुरळे संतापली. झुरळांनी कॉक्रोच जनता पार्टी या नावाखाली चळवळीला प्रारंभ केला. विद्यार्थ्यांना न्याय मिळावा म्हणून लढा सुरू झाला. विद्यार्थ्यांना बळ देण्यासाठी शिक्षणतज्ज्ञ, पर्यावरण तज्ज्ञ सोनम वांगचुक मैदानात उतरले. विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सोनम यांनी उपोषणाची ताकद लावली. उपोषण ही फार मोठी ताकद असून लोकशाहीतील ते एकप्रकारे ब्रह्मास्त्र आहे.

त्याचा वापर वेळोवेळी अन्यायाविरुद्ध करण्यात आला. आजपर्यंत बऱ्याच प्रश्नांची या ब्रह्मास्त्राद्वारे सोडवणूक झाली. सहनशील मार्गाने उपोषण करणे ही लोकशाही मार्गाची प्रथा, परंपरा असून न्याय्य मार्गाने आपल्या मागण्या पूर्ण करून घेणे ही महात्मा गांधींनी दिलेली शिकवण आणि हक्क आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून सुरू झालेली ही चळवळ निरंतर सुरू राहील. या चळवळीच्या माध्यमातून अनेक प्रश्न तडीस गेल्याचा इतिहास आहे. पण आजचे सरकार तो इतिहास पुसण्याच्या प्रयत्नात आहे. अलिकडे कोणत्याही उपोषणाची दखल घ्यायचीच नाही असे जणू काही सरकारने ठरवूनच टाकले आहे. उपोषणकर्ते सोनम वांगचुक यांची ज्या पद्धतीने धरपकड झाली ती पाहता, सत्तेच्या जोरावर उपोषणाची ताकद क्षीण करण्याचा तो जाणूनबुजून केलेला प्रयत्न होता असेच म्हणावे लागेल. खरे तर पहिल्या दिवसापासून उपोषणाकडे दुर्लक्ष करणे योग्य नव्हे, उपोषणामागचा हेतू आणि उद्देश यालाच तिलांजली देण्यासारखे ते आहे. उपोषणाची ताकद आणि लोकशाही मूल्ये जपलीच पाहिजेत. सरकारने दडपशाही सोडून संवादाचा मार्ग स्वीकारायलाच हवा. कारण त्यातच त्यांचे हित आहे.जंतरमंतरवरील आंदोलन पेटल्यानंतर सरकार चर्चेस तयार झाले. हे पाहून असा प्रश्न पडतो की, कोणत्याही गोष्टी हाताबाहेर गेल्याशिवाय निद्रिस्त सरकारला जाग येत नाही का? परिस्थिती हाताबाहेर जायला सर्वस्वी पोलिस व सरकारच जबाबदार असते असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. कारण शांततामार्गाने उपोषण, आंदोलन सुरू असताना पोलिसांनीच आपल्या लक्ष्मणरेषा ओलांडल्या. उपचाराच्या नावाखाली वांगचुक यांना जबरदस्तीने उचलून नेण्यात आले. त्यांच्या सहकाऱ्यांना जनावरासारखी वागणूक देण्यात आली.

# भारतातील पेपरफुटीचा इतिहास: मोदी सरकार विरुद्ध आधीची सरकारे

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

पेपरफुटी (पेपर लीक) आणि परीक्षांमधील गैरप्रकार ही केवळ मोदी सरकारच्याच काळात सुरू झालेली नवी समस्या नाही, तर ती आधीच्या सरकारांच्या (उदा. युपीए) काळातही तितक्याच गंभीरपणे होत होती. ऐतिहासिक आकडेवारी आणि अधिकृत संदर्भांचा अभ्यास केला असता, २००५ ते २०२६ या दोन दशकांच्या काळात देशभरात परीक्षा घोटाळ्यांची अनेक मोठी प्रकरणे समोर आली आहेत. हा प्रश्न कोणत्याही एका राजकीय पक्षापुरता मर्यादित नसून, ती देशातील एक मोठी प्रशासकीय आणि संस्थात्मक अपयशाची बाब मानली जात आहे.

**दोन दशकांचे माध्यम विश्लेषण: युपीए विरुद्ध एनडीए काळ;**

एका व्यापक माध्यम विश्लेषण अहवालानुसार, गेल्या दोन दशकांत (२००५ ते २०२६) देशात २२० हून अधिक परीक्षा घोटाळे आणि पेपरफुटीच्या घटनांची नोंद झाली आहे. या एकूण कालखंडात झालेल्या परीक्षा घोटाळ्यांमुळे देशभरातील जवळपास १० कोटी विद्यार्थ्यांचे भवितव्य प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे प्रभावित झाले आहे. राजकीय कालखंडानुसार याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल:

२००५ ते २०१४ (युपीए व इतर सरकारे): या काळात अंदाजे ७२ प्रकरणांची नोंद झाली, ज्याचा सरासरी वेग वर्षाला ७ घटना असा होता. एका विस्तृत विश्लेषणानुसार, यातील १४ प्रकरणे ही थेट युपीए (काँग्रेस) सरकारच्या काळातील प्रमुख राष्ट्रीय व राज्यस्तरीय परीक्षांशी संबंधित होती.

२०१५ ते २०२६ (मोदी सरकार/एनडीए व इतर सरकारे): डिजिटल क्रांती, सोशल मीडियाचा प्रसार आणि संघटित माफियांच्या वाढीमुळे या काळात १४८ हून अधिक प्रमुख घटना समोर आल्या, ज्याचा वार्षिक सरासरी दर १२ वर पोहोचला. या कालावधीत ८९ पेक्षा जास्त प्रमुख परीक्षांचे पेपर लीक झाले असून, राज्य आणि केंद्र स्तरावरील सर्व लहान-मोठ्या घटना मिळून हा आकडा १५२ पर्यंत जातो.

**मोदी सरकारच्या स्थापनेपूर्वीच्या (२०१४ आधीच्या) प्रमुख घटना:**

मोदी सरकारच्या आधी, काँग्रेस प्रणित युपीए आणि इतर राज्य सरकारांच्या काळातही अनेक राष्ट्रीय व अत्यंत प्रतिष्ठेच्या परीक्षांचे पेपर फुटले होते. त्यातील काही प्रमुख उदाहरणे खालीलप्रमाणे:

**२००३ (कॅट परीक्षा घोटाळा):** आयआयएम प्रवेशासाठी अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'कॅट' परीक्षेचा पेपर लीक झाला होता. हा घोटाळा कुमार सुमन सिंह ऊर्फ 'रंजित डॉन' याने घडवून आणला होता आणि सीबीआयने याचा पर्दाफाश केला होता. २००६: सीबीएससी इयत्ता १२ वीचा अकाऊंटन्सीचा पेपर दिल्लीमध्ये लीक झाला होता.

**२००७:** ऑल इंडिया इंजिनिअरिंग एंट्रन्स एक्झाम चा पेपर फुटला होता, ज्यामुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांना मोठा फटका बसला होता.

**२०११ (एम्स - AIIMS प्रवेश परीक्षा):** ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (AIIMS) च्या पीजी प्रवेश परीक्षेत हायटेक चीटिंग आणि पेपर लीकेजचे मोठे रॅकेट उघडकीस आले होते, ज्यामध्ये काही डॉक्टरांनाही अटक झाली होती.

**२०११-२०१२:** ऑल इंडिया प्री-मेडिकल टेस्ट आणि रेल्वे भरतीच्या परीक्षांमध्येही मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार आणि पेपरफुटी समोर आली होती.

**२०१३ (व्यापम घोटाळा):** मध्य प्रदेशातील बहुचर्चित 'व्यापम घोटाळा' याच काळात उघडकीस आला. या घोटाळ्याची पाळेमुळे २०१३ पूर्वीपासूनच सुरू असलेल्या वैद्यकीय प्रवेश आणि सरकारी भरती परीक्षांच्या पेपरफुटीशी जोडलेली होती.

**मोदी सरकारच्या काळातील राष्ट्रीय परीक्षांचे जाळे आणि आव्हाने (२०१४ ते २०२६):**

मोदी सरकारने देशातील सर्वोच्च प्रवेश परीक्षांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि सुसूत्रता निर्माण करण्यासाठी २०१७ मध्ये 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' ची स्थापना केली. मात्र, केंद्रीकरण करूनही या व्यवस्थेला पेपरफुटीचे आव्हान पेलता आलेले नाही. २०२४ मधील ठएएळ-वञ्च आणि वञ्छ-ठएळ परीक्षांच्या प्रकरणांमुळे या केंद्रीकृत व्यवस्थेच्या सुरक्षा आणि विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले.

तपासातून समोर आलेली सर्वात धक्कादायक बाब म्हणजे पेपरफुटीतील 'माफियांचे पुनरागमन'. २०१५ च्या 'ऑल इंडिया प्री-मेडिकल टेस्ट' पेपरफुटीमध्ये ज्या आरोपींचा (उदा. रवि अत्री आणि इतर टोळ्या) हात होता, तेच कायदेशीर पळवाटांमुळे मोकाट राहिले. परिणामी, २०२४ च्या उत्तर प्रदेश पोलीस भरती आणि नीट परीक्षांच्या पेपरफुटीतही हेच माफिया पुन्हा सक्रिय आढळले.

**प्रमुख राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय घटना:**

**राष्ट्रीय पातळीवर:** नीट युजी, यूजीसी नेट, सीबीएससी (२०१८ मधील १० वी गणित आणि १२ वी अर्थशास्त्र), आणि एसएससी (ररउ) सारख्या सर्वोच्च परीक्षांमधील गैरप्रकार हे मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील आणि एकूण कार्यकाळातील प्रमुख प्रकरणे ठरली.

**राज्य पातळीवर:** उत्तर प्रदेश पोलीस भरती (२०२४), राजस्थानमधील रीट (REET) परीक्षा (२०२१), बिहार बीपीएससी (BPSC - २०२२), आणि महाराष्ट्रातील आरोग्य विभाग भरती (२०२१) व टीईटी (TET) परीक्षा यांसारख्या मोठ्या पेपरफुटीच्या प्रकारांनी लाखो विद्यार्थ्यांना त्रस्त केले.

**'नैतिक जबाबदारी' आणि राजीनाम्याची राजकीय परंपरा:**

भारताच्या राजकीय इतिहासात पेपरफुटीच्या मुद्द्यावरून एकाही केंद्रीय शिक्षणमंत्र्याने किंवा राज्यमंत्र्याने अद्याप नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिलेला नाही. कोणत्याही पक्षाचे सरकार केंद्रात असो, हा अलिखित नियम सर्वांनीच पाळला आहे.

अलीकडच्या नीट आणि यूजीसी नेट परीक्षांच्या पेपरफुटीनंतर, विरोधक आणि विद्यार्थी संघटनांकडून विद्यमान केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची तीव्र मागणी केली जात आहे. दिल्लीत आणि देशभरात यावरून आक्रमक आंदोलने झाली आहेत, परंतु मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. तीच परिस्थिती पूर्वीच्या सरकारांमध्येही होती.

**कायदेशीर पावले: 'सार्वजनिक परीक्षा कायदा, २०२४' ची सद्यस्थिती:**

परीक्षांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि पेपरफुटीच्या संघटित टोळ्यांना आळा घालण्यासाठी मोदी सरकारने 'सार्वजनिक परीक्षा (अनुचित साधनांना प्रतिबंध) कायदा, २०२४' (Public Examinations Act, 2024) मंजूर केला असून, तो २१ जून २०२४ पासून देशभरात लागू करण्यात आला आहे. या कायद्यात अत्यंत कठोर शिक्षेच्या तरतुदी आहेत:

**वैयक्तिक गुन्हेगार:** परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या किंवा पेपर लीक करणाऱ्या वैयक्तिक गुन्हेगाराला ३ ते ५ वर्षांचा कारावास आणि १० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.

**संघटित पेपरफुटी माफिया :** पेपरफुटीचा संघटित व्यापार करणाऱ्या टोळ्यांसाठी ५ ते १० वर्षांचा कठोर कारावास आणि किमान १ कोटी रुपये दंडाची तरतूद आहे. तसेच, या गुन्ह्यात सामील असलेल्या संस्था किंवा परीक्षा केंद्रांची मालमत्ता जप्त करण्याची आणि परीक्षेचा संपूर्ण खर्च त्यांच्याकडून वसूल करण्याची कायदेशीर तरतूद यामध्ये करण्यात आली आहे.

पेपरफुटी ही भारतात अनेक दशकांपासून चालत आलेली एक खोलवर रुजलेली व्यवस्थात्मक समस्या आहे.

पूर्वीच्या सरकारांमध्येही पेपर फुटत होते आणि आताही फुटत आहेत. मात्र, सध्याच्या काळात डिजिटल एन्क्रिप्शन आणि टेलिग्राम व व्हॉट्सअपसारख्या डिजिटल माध्यमांमुळे काही मिनिटांत लाखो विद्यार्थ्यांपर्यंत पेपर पोहोचणे सोपे झाले आहे. तंत्रज्ञानाच्या या गैरवापरामुळे आणि संघटित माफियांच्या जाळ्यामुळे या समस्येने आता अत्यंत भयानक रूप धारण केले आहे. कठोर कायदे कागदावर आले असले, तरी त्यांची अंमलबजावणी आणि 'राजीनामा' देण्याची नैतिक राजकीय परंपरा कोणत्याही सरकारच्या काळात पाळली गेलेली नाही, हेच देशाचे दुर्दैव आहे.

- ९५६१५९४३०६

# यशासोबतच संघर्षाची चर्चा व्हायला हवी!

रवींद्र गोविंद पांडे
नागपूर

कौतुक कोणाला आवडत नाही. प्रत्येकालाच आवडतं. अन् ते व्हायला पण हवं.तसेच आयुष्यात एखाद्या स्पर्धेत, परिक्षेत यश प्राप्त झाले तर त्याचे अभिनंदन केले,त्याला मिळालेल्या यशाबद्दल त्याची पाठ थोपटली तर त्या व्यक्तीला आनंदच होईल.तसेच प्रोत्साहन सुध्दा मिळेल.

कोणतेही यश हे सहजपणे मिळत नाही.ज्यावेळी एखाद्या व्यक्तीला यश प्राप्त होते तेव्हा त्याच्या पाठीमागे त्याचे परिश्रम, त्यासाठी करावा लागणारा संघर्ष सुध्दा प्रत्येकाने लक्षात घेतला पाहिजे, समजून घेतले पाहिजे. त्याचे परिश्रम, त्यांचा संघषार्मुळेच हे फळ मिळालेले असते हे निश्चित. एखाद्याचे कौतुक करीत असतांनाच त्याने यासाठी काय काय केले, त्याने प्रयत्न कसे केले, कशाप्रकारे आणि कोणत्या परिस्थितीतून मार्ग काढत तयारी करावी लागली याची माज्या मते या विषयावर चर्चाच व्हायला हवी.अशा प्रकारची जेव्हा चर्चा होईल तेव्हा त्याचा हा आदर्श इतरांना समोर ठेवून त्यांना तसे प्रयत्न करता येईल.त्याची इच्छा शक्ती जागृत झाली अन् तसे प्रयत्न केले तर यश पण मिळू शकेल.

समाजात असे अनेक उदाहरणे आहेत की,त्यांचे आयुष्य संघर्षमय राहिले आहे.त्यांनी अनंत अडचणींचा सामना करीत यश खेचून आणले आहे. अशा व्यक्तींच्या संघर्षाच्या सत्यकथा समाजासमोर मांडल्या तर निश्चितपणे अनेकजण त्यांच्या पावलावर पाऊल टाकत यशस्वी होण्याचा प्रयत्न करतील. त्यांची संघर्ष कथा ही



अनेकांना प्रेरणादायी ठरेल, प्रेरणा देणारी राहील. देशपातळीवर प्रसिद्ध व्यक्तिमत्वे ज्यांनी ज्यांनी कठीण काळात मेहनत घेतली आणि ते यशस्वी झाले त्यांचा संघर्षमय इतिहास भावी आजच्या युवा पिढीला अवगत होण्यासाठी शालेय विशेषतः प्राथमिक पाठ्यपुस्तकात समाविष्ट केला तर निश्चितच अनेकांचे आयुष्य घडवले जाईल.

आज समाजात अशी अनेक युवक युवती आहेत की,ते आयुष्यात यशस्वी होण्यासाठी धडपडत असतात. त्यांची इच्छा शक्ती मोठी आहे,त्यांचे स्वप्न मोठे आहेत,त्यांची मेहनत घेण्याची तयारी आहे पण त्यांच्या कुटुंबाची परिस्थिती - मग ती आर्थिक असो, शारीरिक असो वा मानसिक - नाही.अशा युवांच्या मागे समाजातील स्वयंसेवी संस्थांनी आणि जे आर्थिक दृष्ट्या सक्षम आहेत त्यांनी अशा गरजूंना आधार देत पाठीशी उभे राहीले तर त्यांना हिंमत येऊन ते यशस्वी होतील. असे म्हटले आहे की," यशश्री पायाची दासी ".ज्यांची मेहनत घेण्याची तयारी आहे,संघर्ष करावा लागला तरी तो करायची तयारी आहे अशांच्या सोबत समाजाने खंबीरपणे उभे राहून त्याला साथ दिली तर त्याला यश मिळून त्याचे जीवनातील एक स्वप्न पूर्ण होईल.

तसेच हे स्वप्न पूर्ण झाल्यावर त्याच्या परिवाराला बळ मिळेलच त्याचबरोबर आपणही समाजाचे ऋणी आहोत ही भावना मनात निर्माण होऊन समाजाचे जेवढे हित जोपासले जातील तेवढे पूर्ण शक्तिनिशी करण्याचा प्रयत्न केला जाईल. समाजाचे हित जोपासत असतांना प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष रीत्या देशाला सुध्दा फायदाच होईल.देशाची मान उंचावली जाईल अशी कृती त्यांच्याकडून केली जाईल.

असे एखाद्याचे स्वप्न पूर्ण झाले तर आपणही आयुष्यात एक चांगले कार्य केले याचा आपल्याला होणारा मनस्वी आनंद हा मोजता येणार नाही हे नक्की.

- ९३२५४५७०५२

# बीसीसीआयचे 'मास्टरस्ट्रोक' बदल: जाणूनबुजून टाकलेला नो-बॉल पडणार महाग, संपूर्ण सामन्यासाठी गोलंदाज होणार आउट!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारतीय देशांतर्गत क्रिकेटचा आगामी २०२६-२७ चा हंगाम अधिक थरारक, पारदर्शक आणि शिस्तबद्ध होणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) नव्या हंगामाची सुरुवात होण्यापूर्वी खेळाच्या नियमांत काही अत्यंत महत्त्वाचे आणि क्रांतिकारी बदल केले आहेत. मेरीलेबोन क्रिकेट क्लबने (एमसीसी) सुचवलेल्या या नव्या सुधारणा लागू झाल्यामुळे आता खेळाडूंची छोटीशी चूक किंवा अतिहुशारी संपूर्ण संघाला महागात पडू शकते!

नुकत्याच जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार बीसीसीआयने सर्व राज्य क्रिकेट संघटनांना या नव्या नियमांची माहिती दिली आहे. येत्या सत्रात रंगणाऱ्या 'दुलीप ट्रॉफी'पासून हे नवे नियम प्रत्यक्ष मैदानावर पाहायला मिळतील.

**१. नो-बॉल टाकला अन् सामना गमावला! (नियम ४१.८)**

नव्या नियमांमधील सर्वात मोठा धक्का गोलंदाजांसाठी आहे. जर एखाद्या गोलंदाजाने जाणूनबुजून फ्रंट-फूट नो-बॉल टाकला किंवा त्याचा पाय निर्धारित रेषेच्या भलताच पुढे गेला, तर मैदानातील पंचांना त्याला थेट संपूर्ण सामन्यासाठी निलंबित करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. याआधी अशा प्रकरणात गोलंदाजाला केवळ संबंधित डावापुरते (इंनिग्ज )निलंबित केले जात होते. परंतु आता एका चुकीमुळे गोलंदाजाचा पूर्ण सामना संपणार आहे.

**२. दिवसाच्या शेवटच्या षटकाचा पूर्ण ड्रामा! (नियम १२.५.२)**

आतापर्यंत दिवसाच्या शेवटच्या षटकात विकेट पडल्यास वेळ वाचवण्यासाठी लगेचच त्या दिवसाचा खेळ थांबवला जायचा. मात्र, नव्या नियमानुसार आता शेवटच्या षटकात विकेट पडली तरी ते षटक पूर्ण खेळवले जाईल. दिवसाच्या शेवटी नवीन फलंदाजाला क्रीजवर येण्यापासून रोखणारी अट एमसीसीने रद्द केल्यामुळे शेवटच्या षटकातील थरार आणि नाट्य अधिक वाढणार आहे.

**३. कृत्रिम निकालांना पूर्णविराम ! (नियम १५.२)**

अनेकदा सामने जिंकण्यासाठी किंवा गुणांची गणितं जुळवण्यासाठी संघांकडून रणनीतीच्या नावाखाली अवाजवी डावपेच आखले जायचे. याला चाप लावण्यासाठी आता सामन्याच्या शेवटच्या डावात कोणताही संघ आपला डाव घोषित (डिक्लेर) करू शकणार नाही किंवा सोडून देऊ शकणार नाही. खेळाच्या भावनेला छेद देऊन 'कृत्रिम निकाल' (आर्टिफिशिएल रिझल्टस) मिळवण्याच्या प्रकारांना अटकाव घालण्यासाठी हा कठोर निर्णय घेण्यात आला आहे.

**४. ड्रिंक्स ब्रेक अन् प्रशिक्षकांची रणनीती !**

देशांतर्गत एकदिवसीय सामन्यांमध्ये आता ड्रिंक्स ब्रेकच्या वेळी मुख्य प्रशिक्षकाला मैदानावर जाण्याची अधिकृत परवानगी असेल. आंतरराष्ट्रीय स्तरावरही आयसीसी असाच नियम लागू करण्याच्या तयारीत आहे. या निर्णयामुळे ब्रेकदरम्यान मैदानातच थेट रणनीती बदलताना आणि खेळाडूंना थेट मार्गदर्शन मिळताना पाहायला मिळेल.

**५. यष्टीरक्षकांना मोठा दिलासा!**

यष्टीरक्षकांसाठी (विकेटकिपर) एक महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक बदल करण्यात आला आहे. यापूर्वी गोलंदाजाने धावायला सुरुवात करताच यष्टीरक्षकाला आपले ग्लोव्हज यष्टीच्या मागे ठेवावे लागत असत. मात्र आता केवळ चेंडू टाकला जात असतानाच ( रिलिज पॉईंट) ग्लोव्हज यष्टीमागे ठेवावे लागतील. यापूर्वी ग्लोव्हजच्या पोझिशनवरून अनेकदा अनावश्यक नो-बॉल दिले जायचे किंवा यष्टीचीत (स्टंपिंग) अवैध ठरवली जायची, या त्रासातून यष्टीरक्षकांची आता सुटका झाली आहे.

**पंचांसाठी विशेष कार्यशाळा आणि पूर्ण तयारी!**

सामनाधिकारी आणि पंचांना या नव्या नियमांची खडान् खडा माहिती व्हावी यासाठी बीसीसीआयकडून विशेष जनजागृती कार्यक्रम आणि कार्यशाळांचे आयोजन केले जात आहे. देशांतर्गत हंगाम सुरू होण्यास अजून महिनाभराचा कालावधी शिल्लक असल्याने या बदलांची अंमलबजावणी अगदी चोख केली जाईल, असा विश्वास मंडळाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

एकंदरीत, बीसीसीआयच्या या 'सर्जिकल स्ट्राइक'सारख्या निर्णयांमुळे आगामी देशांतर्गत हंगामात केवळ चौकार-षटकारांचीच आतषबाजी दिसणार नाही, तर नियमांची नवी शिस्त आणि मैदानावरचा हाय-व्होल्टेज ड्रामा क्रिकेटचाहत्यांची उत्कंठा शिगेला पोहोचवेल.

क्रिकेटला शिस्त आणून आणखी लोकप्रिय करण्याची आयसीसीची धडपड पुढे चालविण्याची जबाबदारी योग्य रित्या पार पाडताना बीसीसीआयने अतिशय योग्य पाऊल टाकून या जनप्रिय खेळाला आणखी लोकाभिमुख व सुटसुटीत करण्याचा हा एक भाग आहे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# एसएलआरकडून सरकारी जमिन घोटाळ्याची पुष्टी

## सिटी सर्व्हे नोंदीतील चुकीच्या नोंदी दुरुस्त करण्याचे व चौकशीचे आदेश, अन्याय निवारण मंचाच्या अध्यक्षा ज्वाला जांबुवंतराव धोटे यांच्या तक्रारीची आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशांची दखल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अन्याय निवारण मंचाच्या अध्यक्षा ज्वाला जांबुवंतराव धोटे यांनी उघडकीस आणलेल्या फ्रेंड्स कॉलनी, काटोल रोड येथील सरकारी जमिन घोटाळ्याची जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख (एसएलआर), नागपूर जिल्हा, यांनी पुष्टी केली असून, हनुमान मंदिर, सार्वजनिक विहीर व इतर सरकारी मालमत्तेसह सुमारे २८ हजार चौ. फूट सरकारी जमिनीवर सिटी सर्व्हे कार्यालय क्र. ३ मध्ये खाजगी व्यक्तींच्या झालेल्या चुकीच्या नोंदी दुरुस्त करण्याचे आदेश दिले आहेत.



फ्रेंड्स कॉलनी, काटोल रोड, मौजा बोरगाव येथील खसरा क्रमांक १५६ या जमिनीवर महसूल विभागाच्या ७/१२ उताऱ्यावर महाराष्ट्र शासनाचे नाव कायम असतानाही, सिटी सर्व्हे कार्यालयाने सातपैकी पाच सिटी सर्व्हे क्रमांकांमध्ये खाजगी व्यक्तींची नावे नोंदविण्यात आली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सिटी सर्व्हे अधिकारी क्र. ३ अजित साळुंखे यांनी २३ जुलै २०२६ रोजी सिटी सर्व्हे क्रमांक ५४२ (खसरा क्रमांक १५६ मधून तयार करण्यात आलेल्या सात सिटी सर्व्हे क्रमांकांपैकी एक) संदर्भात सुनावणी घेतली. या सिटी सर्व्हे क्रमांकामध्ये हनुमान मंदिर, सार्वजनिक विहीर तसेच व्यावसायिक संकुलाचा समावेश आहे. या सुनावणीला ज्वाला जांबुवंतराव धोटे, जय हनुमान सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष सुरेंद्र तायवाडे यांच्यासह मंदिराचे भाविक उपस्थित होते. याच सुनावणीदरम्यान जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्या आदेशाची माहिती समोर आली.

काही वर्षांपूर्वी जय हनुमान सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून ज्वाला जांबुवंतराव धोटे व भाविकांनी भूमाफियांना हनुमान मंदिर व सार्वजनिक विहिरीच्या जागेवर बेकायदेशीर ताबा घेण्यापासून रोखले होते. त्यानंतर ही जमीन ब्रिटिश काळापासून शासनाची असल्याचे सिद्ध करण्यासाठी विविध शासकीय विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

२४ मे २०२६ रोजी ज्वाला जांबुवंतराव धोटे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन या सरकारी जमिन घोटाळ्याबाबत तक्रार सादर केली. त्यानंतर बावनकुळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावली. या बैठकीस ज्वाला जांबुवंतराव धोटे, जय हनुमान सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टचे पदाधिकारी व भाविक तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत महसूल मंत्र्यांनी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांना चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम २० अंतर्गत अधिकारांचा वापर करून दि. २९ जून २०२६ रोजी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांनी फ्रेंड्स कॉलनी, काटोल रोड, मौजा बोरगाव येथील शासनाच्या मालकीच्या खसरा क्रमांक १५६ मधून तयार करण्यात आलेल्या सिटी सर्व्हे क्रमांक ५३७ ते ५४३ मधील सर्व नोंदींची फेरचौकशी करण्याचे आदेश सिटी सर्व्हे अधिकारी क्र. ३ यांना दिले.

या आदेशात जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांनी स्पष्ट नमूद केले आहे की, ०.२६ हेक्टर (२८ हजार चौ. फूट) जमीन आजही जिल्हाधिका?्यांच्या कार्यालयातील ७/१२ उताऱ्यावर शासनाच्या नावाने नोंदलेली आहे. मात्र, त्याच सरकारी जमिनीवरून तयार करण्यात आलेल्या सिटी सर्व्हे क्रमांक ५३७, ५३९, ५४०, ५४२ आणि ५४३ या पाच सिटी सर्व्हे क्रमांकांमध्ये खाजगी व्यक्तींची नावे नोंदविण्यात आली आहेत.

जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांनी आपल्या आदेशात नमूद केले आहे की, तत्कालीन सिटी सर्व्हे कार्यालय क्र. ३ मधील अधिकाऱ्यांकडून नोंदी तयार करताना किंवा अद्ययावत करताना झालेल्या त्रुटींची फेरचौकशी करून दुरुस्ती करणे आवश्यक असून त्यासाठी संबंधित आदेश देण्यात आले आहेत.

या आदेशाचे स्वागत करताना ज्वाला जांबुवंतराव धोटे यांनी सांगितले की, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्या निष्कर्षामुळे ही जमीन शासनाचीच असल्याचा भाविक व स्थानिक नागरिकांनी सातत्याने घेतलेला दावा सिद्ध झाला आहे. सिटी सर्व्हे कार्यालय क्र. ३ ने चौकशी तातडीने पूर्ण करून खाजगी व्यक्तींच्या बेकायदेशीर नोंदी रद्द कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. तसेच, या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन योग्य कार्यवाहीचे निर्देश दिल्याबद्दल त्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले.

## जंतर-मंतर येथील विद्यार्थी अत्याचाराच्या निषेधार्थ सालेकसात उद्या भव्य शांतता मार्च

### सर्व सामाजिक व विद्यार्थी संघटनांचे नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा – राजू फुंडे**

दिल्ली येथील जंतर-मंतर परिसरात विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित अमानुष अत्याचाराच्या निषेधार्थ सालेकसा तालुक्यातील विविध सामाजिक व विद्यार्थी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दिनांक २४ जुलै रोजी सकाळी १० वाजता भव्य शांतता मार्च आयोजित करण्यात आला आहे. या शांतता माचार्ची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून होऊन गांधी प्रतिमा, सुभाष चौक, बस स्टँड मार्गे तहसील कार्यालय, सालेकसा येथे समारोप होणार आहे. या वेळी विद्यार्थ्यांवरील अन्यायाविरोधात निषेध नोंदवून संबंधित प्रशासनाकडे निवेदन सादर करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या आंदोलनात तालुक्यातील नागरिक, विद्यार्थी, युवक, महिला, विविध सामाजिक संघटना तसेच सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच तालुक्यातील व्यापारी व दुकानदारांनीही दुपारपर्यंत स्वेच्छेने आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून या शांततापूर्ण आंदोलनाला सहकार्य करावे, अशी विनंती आयोजकांनी केली आहे. "अन्याय सहन नाही, आवाज उठवणे हा अधिकार आहे" या संदेशासह न्यायासाठी एकजूट दाखविण्याचे आवाहन करण्यात आले असून, शांततेच्या मार्गाने विद्यार्थ्यांवरील अत्याचाराचा निषेध नोंदविण्यात येणार आहे. आयोजकांनी सर्व नागरिकांनी शिस्तबद्ध व शांततेने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे.

## अंबाड्यात दारू माफियांविरोधात रणशिंग; पोलीस अधीक्षक ग्रामपंचायतीत दाखल, महिला मंडळाच्या धाडसी लढ्याचे कौतुक

### 'अवैध धंदे करणाऱ्यांना तडीपार करा' : ग्रामपंचायत बैठकीत एकमुखी मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

दारूबंदी असलेल्या अंबाडा गावात अवैध गावठी दारूविरोधात महिला मंडळाने छेडलेल्या आक्रमक आंदोलनाची दखल घेत नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षकांनी अंबाडा ग्रामपंचायतीत विशेष बैठकीला उपस्थित राहून संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेतला. गेल्या काही दिवसांपासून अवैध दारू व्यवसायाविरोधात वृत्तपत्रांत सातत्याने प्रसिद्ध होत असलेल्या बातम्या, महिला मंडळाने केलेल्या धाडसी कारवाया आणि ग्रामस्थांचा वाढता रोष याची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षकांनी महिला मंडळाच्या कायार्चे कौतुक केले.



ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या बैठकीत महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी गावातील अवैध दारू व्यवसायामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत असल्याचे सांगत सराईत आरोपींवर केवळ गुन्हे दाखल करून चालणार नाही, तर त्यांच्यावर तडीपारसारखी कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी केली.

बैठकीत अलीकडेच महिला मंडळाने खलानगोंदी शिवारात धाड टाकून ३५ पिपे गावठी दारूचे रसायन नष्ट केल्याच्या कारवाईचाही उल्लेख करण्यात आला. ग्रामस्थांच्या धाडसी भूमिकेमुळे अंबाडा परिसरातील अवैध दारू व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचेही यावेळी सांगण्यात आले. यावेळी गावात नियमित पोलीस गस्त वाढविणे, अवैध दारू अड्ड्यांवर सातत्याने धाडी टाकणे, माहिती देणाऱ्या नागरिकांची ओळख गोपनीय ठेवणे, तसेच दारू माफियांच्या आर्थिक साखळीचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याबाबत चर्चा झाली. महिला मंडळाच्या प्रतिनिधींनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, गावात पुन्हा अवैध दारूचा व्यवसाय सुरू होऊ दिला जाणार नाही. गरज पडल्यास महिलाच पुन्हा रस्त्यावर उतरून आंदोलन करतील. ग्रामस्थांनीही या भूमिकेला एकमुखी पाठिंबा दिला.

बैठकीनंतर पोलीस अधीक्षकांनी अवैध धंद्यांविरोधात पोलीस प्रशासन कोणतीही तडजोड करणार नसल्याचे सांगितल्याची माहिती उपस्थितांनी दिली. तसेच अवैध दारू व्यवसाय करणाऱ्या सराईत व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासोबतच तडीपार प्रस्तावांचाही विचार करण्यात येईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

अंबाडा ग्रामपंचायतीत झालेल्या या बैठकीमुळे अवैध दारू व्यवसायाविरोधातील लढ्याला नवे बळ मिळाले असून, परिसरातील दारू माफियांमध्ये मोठी खळबळ उडाल्याची चर्चा सुरू आहे.

## गॅससाठी पहाटेपासून रांगा, नरखेडमध्ये एलपीजी पुरवठ्याचा प्रश्न कायम

### डीएसी मंजुरीअभावी पुरवठा विस्कळीत, २२ जुलैच्या बैठकीकडे नागरिकांचे लक्ष

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यात घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या पुरवठ्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. गेल्या काही महिन्यांपासून गॅसचा पुरवठा नियमित होत नसल्याने ग्राहकांना पहाटेपासूनच गॅस गोदामाबाहेर रांगा लावाव्या लागत आहेत. तासन्तास प्रतीक्षा करूनही अनेकांना सिलेंडर न मिळाल्याने रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याचे चित्र आहे.



नरखेड शहरासह सुमारे ३० किलोमीटर परिसरातील गावांमधून महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, मजूर आणि नोकरदार दररोज गॅस मिळविण्यासाठी माणिकवाडा येथील गॅस गोदामावर येत आहेत. मात्र, अपुऱ्या पुरवठ्यामुळे अनेक ग्राहकांची निराशा होत असून, दिवसेंदिवस नागरिकांमध्ये संताप वाढत आहे.

या प्रश्नाबाबत तहसीलदार, पुरवठा विभाग, संबंधित गॅस एजन्सी, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच लोकप्रतिनिधींकडे अनेक वेळा निवेदने देण्यात आली आहेत. तालुका दक्षता समितीच्या बैठकीतही हा विषय उपस्थित करण्यात आला होता. मात्र, अद्यापही परिस्थितीत कोणताही ठोस बदल झालेला नसल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

गॅससाठी वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याने रोजंदारीवर काम करणाऱ्यांचा रोजगार बुडत आहे. शेतकऱ्यांच्या शेतीच्या कामांवर परिणाम होत असून, विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचेही नुकसान होत आहे. अनेक कुटुंबांना पर्यायी इंधनाचा वापर करण्याची वेळ आली आहे.

दरम्यान, राम इंडेन, नरखेडचे भागीदार दीपक पौनिकर यांनी सांगितले की, डीएसी प्रणाली लागू होण्यापूर्वी मॅन्युअल पद्धतीने वितरित करण्यात आलेल्या सिलेंडरच्या डीएसीला इंडियन ऑइल कॉर्पोरेशनकडून मंजुरी मिळालेली नसल्यामुळे प्लांटमधून गॅस लोड निघण्यास अडचण निर्माण झाली आहे. मंजुरी मिळताच पुरवठा पूर्ववत होईल. या संदर्भात २२ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात आली असून, त्यामध्ये या प्रश्नावर तोडगा निघण्याची अपेक्षा आहे.

नागरिकांनी जिल्हाधिकारी, पुरवठा विभाग, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन आणि संबंधित लोकप्रतिनिधींनी या प्रश्नात तातडीने लक्ष घालून नियमित व सुरळीत गॅस पुरवठा सुरू करावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

**शामराव बारई (अध्यक्ष, समन्वय समिती, नरखेड)**
"डिजिटल युगातही गॅससाठी पहाटेपासून रांगेत उभे राहावे लागते, ही शोकांतिका आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा."

**मुकेश शेंडे (माजी नगरसेवक)**
"गॅस हा जीवनावश्यक विषय आहे. नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी त्वरित उपाययोजना करावी."

**हृषीकेश पोतदार (सामाजिक कार्यकर्ता) :**
"ग्रामीण भागातील नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात आहेत. पुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्याची गरज आहे."

**विनोद क्षीरसागर (नागरिक कृती समिती) :**
"ज्येष्ठ नागरिकांनाही तासन्तास रांगेत उभे राहावे लागते. ही परिस्थिती तातडीने बदलली पाहिजे."

थोडक्यात

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त व स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम

### मेंढला येथे फळे, बिस्किटे, शैक्षणिक साहित्य वाटप; विद्यार्थी व रुग्णांच्या चेहऱ्यावर आनंद



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त भाजप युवा मोर्चा जलालखेडा मंडळाच्या वतीने मेंढला येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. काटोल विधानसभा क्षेत्राचे आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या सूचनेनुसार तसेच भाजप नागपूर ग्रामीण जिल्हा मंत्री दिलेश ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम उत्साहात पार पडला. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र, मेंढला येथे उपचारासाठी आलेल्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी, मेंढला येथे विद्यार्थ्यांना बुक, पेन व फळांचे वितरण करून शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे आनंदाने स्वागत केले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी वाढदिवस आणि जयंती साजरी करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे समाजोपयोगी उपक्रम राबविणे होय, असे मत व्यक्त केले. गरजू, रुग्ण आणि विद्यार्थ्यांप्रती सामाजिक बांधिलकी जपत अशा सेवा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला भाजप युवा मोर्चा नागपूर ग्रामीण जिल्हा सचिव तुषार राऊत, युवा मोर्चा जलालखेडा मंडळ अध्यक्ष नाना मानकर, आरोग्य अधिकारी डॉ. आकाश वाघमारे, डॉ. प्रणाली हेडाऊ, मेंढला जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत मनकवडे, मंडळ महामंत्री प्रीतम गाजरे, विष्णुजी चरपे, रवी कनेरे, निखिल लोहे, प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व नर्सेस, शिक्षक, अंगणवाडी सेविका, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले. लाभार्थ्यांना सन्मानपूर्वक साहित्याचे वितरण करण्यात आले. उपक्रमामुळे रुग्ण, विद्यार्थी व पालकांनी आयोजकांचे आभार मानले. सामाजिक उत्तरदायित्व जपत भविष्यातही अशाच लोकहिताच्या उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, असा निर्धार यावेळी भाजप युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मातोश्री वृद्धाश्रमात वृक्षारोपण



पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शेकडो रोपांची लागवड

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बल्लारपूर येथील मातोश्री वृद्धाश्रम परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विविध प्रजातींच्या शेकडो रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निरोगी, दीर्घायुषी आणि यशस्वी आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मंत्री शोभा फडणवीस यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आले. याप्रसंगी जिल्हाधिकारी वसुमना पंत, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकीत सिंह, माजी आमदार संजय धोटे, डॉ. रजनी हजारे, वृध्दाश्रम चे सचिव अजय जयस्वाल, जिल्हा परिषद उपअभियंता प्रकाश कारेगोडा, शाखा अभियंता आंबेडकर, शाखा अभियंता वैभव जोशी, राजू डोहे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनीही वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाची सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले.

वाढते प्रदूषण आणि हवामानातील बदल लक्षात घेता प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करणे ही काळाची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. मातोश्री वृद्धाश्रम परिसर अधिक हिरवागार आणि पर्यावरणपूरक करण्याच्या उद्देशाने विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. उपस्थितांनी लावलेल्या रोपांचे संवर्धन करण्याचा संकल्पही केला. हरित महाराष्ट्राच्या संकल्पनेला बळ देणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी शुभेच्छा देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## प्रगती पाटील यांची भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश महामंत्रीपदी नियुक्ती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी नागपूरच्या माजी नगरसेविका प्रगती पाटील यांची भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश महामंत्रीपदी नियुक्ती केली आहे. नियुक्तीचे अधिकृत पत्र त्यांना गुरुवारी प्राप्त झाले. सलग तीन वेळा नगरसेविका म्हणून निवडून आलेल्या प्रगती पाटील यांनी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्या सातत्याने विविध उपक्रम राबवत असून ऑटो युनियन, कुली युनियन, महिला कट्टा, रोटरी क्लब नागपूर एलिट तसेच विदर्भ गौरव प्रतिष्ठान आणि लोकगर्जना या विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून त्या सक्रियपणे कार्यरत आहेत. महिला संघटन बळकट करण्यासाठी तसेच राज्यभरातील महिला कार्यकर्त्यांना संघटित करून पक्षाचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.



या नियुक्तीबद्दल प्रगती पाटील यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांचे आभार व्यक्त केले.

थोडक्यात

## खरडा येथे श्री पद्धतीने भात लागवड प्रशिक्षण



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

आज गुरुवार (ता.२३ जुलै) रोजी खरडा येथे राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान २०२६-२७ अंतर्गत श्री पद्धतीने भात लागवड प्रकल्प आधारीत शेतकरी प्रशिक्षण सत्र १ घेण्यात आले. सदर शेतकरी प्रशिक्षणात पंकज ठेंगणे, प्रभारी मंडळ कृषी अधिकारी, निमखेडा यांनी धान लागवडीच्या विविध सुधारित पद्धती, श्री पद्धत, यांत्रिकी पद्धतीने भात लागवड, रोपवाटिका व्यवस्थापन, रोवणी तंत्रज्ञान, एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन, खतांचा संतुलित वापर, अझोला निर्मिती इत्यादी विषयी माहिती दिली. धान व मिरची पिकातील प्रमुख आव्हाने यांविषयी संवाद साधला तसेच मनोज अडे यांनी सेंद्रिय खतांचा वापर, रस शोषक किड नियंत्रण, मिरची, भेंडी लागवड इत्यादी विषयी माहिती दिली.

बसवराज सिंहासन यांनी खरीप पीक स्पर्धा, पीक विमा योजना,प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनाबाबत माहिती दिली. पीक विमा योजनेतील शेतकऱ्यांनी भरावयाचे विमा हफ्ता रक्कम, निकष, उंबरठा उत्पन्नबाबत माहिती देऊन सर्व शेतकरी बांधवांना पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी प्रकल्प अंतर्गत सर्व लाभार्थी शेतकरी उपस्थित होते.

## अजितदादा पवार जयंतीनिमित्त अभिवादन




**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

येथील पारवे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पारवे नर्सिंग कॉलेज आणि प्यारा मेडिकल इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम पार पडला. संस्थेच्या सहसचिव दीपाली पारवे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. सुभाष उपाटे, जीएनएम प्राचार्या चारुलता गुळघाणे, नर्सिंग कॉलेजचे उपप्राचार्य भूमाने, तसेच कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. गोसावी यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्ष दीपाली पारवे व प्रमुख अतिथी डॉ. सुभाष उपाटे यांनी अजित पवार यांच्या जीवनावर प्रकाश टाकत महाराष्ट्राच्या विकासात त्यांचे असलेले योगदान कथन केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. वैशाली राऊत यांनी केले, तर आभार पूनम गोंडी-मेश्राम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. देवेंद्र परशुरामकर, डॉ. संगीता चव्हाण, प्रकाश देवीकर, आशिष बिसने यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

## रक्तदान करून स्व. अजितदादा पवार यांची जयंती साजरी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महासचिव आनंदसिंह यांच्या वतीने माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त फरस चौक येथील त्यांच्या जनसंपर्क कार्यालय परिसरात भव्य रोगनिदान व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी होत आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली. तसेच रक्तदाब (बीपी) व मधुमेह (शुगर) नियंत्रणात कसा ठेवावा, याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेऊन महत्त्वपूर्ण माहिती जाणून घेतली. शिबिरात ३५ जणांनी रक्तदान करून समाजात रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत जनजागृतीचा संदेश दिला.

यावेळी भव्य अन्नदान कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेतला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी स्व.अजित पवार यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण अभिवादन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रितेश लककेवार, रुबी बरटी, प्रमोद ससासे, रवी विश्वकर्मा, विजय गौरकर, कमल भट्टड, लोकेश पुरोहित, धर्मेंद्र भटेजा, डेविडभाई, बच्चू तिवारी, पप्पू राऊत, रंजीत मेश्राम, डॉ. रामटेके, डॉ. मेंढे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## खते आणण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा अपघातात जागीच मृत्यू

**वृत्तसंस्था, बीड**

बीड जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. खते आणण्यासाठी जात असलेल्या शेतकऱ्याचा हायवा खाली चिरडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. बीडच्या केजमधून काळजाचा थरकाप उडवणारी अपघाताची घटना समोर आली आहे. बीडच्या अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर मृत्यूचा थरार पाहायला मिळाला.

केजच्या भवानी चौकात धारुर कडून भरधाव वेगाने येणाऱ्या हायवाने खते आणण्यासाठी जात असलेल्या शेतकऱ्याला चिरडल्याची घटना घडलीय. हा अपघात इतका भीषण होता की दुचाकीहून जात असलेल्या नितीन आदिनाथ चाटे या शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. इतकच नाही तर या अपघातात त्याच्या शरीराचे दोन भाग झाल्याने घटनास्थळी हृदयद्रावक दृश्य निर्माण झाले. घटनेनंतर अपघातस्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली.अपघाताच्या या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# मनपाविरुद्ध नव्याने दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणांची माहिती उपलब्ध करावी

### विधी विशेष समिती सभापती कु. निधी तेलगोटे यांचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या विधी विशेष समितीची सभा सभापती कु. निधी तेलगोटे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (ता. २३) मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात पार पडली. यावेळी समितीच्या बैठकीत चर्चेअंती विविध विषयांना मंजुरी देण्यात आली. तसेच विधी विशेष समिती सभापती कु. निधी तेलगोटे यांनी महानगरपालिकेविरुद्ध नव्याने दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणांची आणि न्यायालयाकडून प्राप्त महत्त्वपूर्ण आदेशाची माहिती, प्रत्येक महिन्यात समितीपुढे सादर करण्याचे निर्देश दिले.

या बैठकीला उपसभापती ॲड. संजयकुमार बालपांडे, सदस्य धनश्री देशपांडे, शारदा बारई, ॲड. निलेश गायधने, ॲड. शैलेंद्र डोरले, पवन कोये यांच्यासह प्र. अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त निर्भय जैन, सहायक आयुक्त श्याम कापसे, राजकुमार मेश्राम, घनश्याम पंधरे, विधी अधिकारी सूरज पारोचे, माहिती तंत्रज्ञान अधिकारी स्वप्नील लोखंडे यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बैठकीत मनपाच्या संकेत स्थळावर न्यायालयीन प्रकरणांची माहिती नागरिकांना सहज उपलब्ध व्हावी, यासाठी तयार करण्यात येत असलेल्या 'डॅशबोर्डचे सादरीकरण माहिती तंत्रज्ञान अधिकारी स्वप्नील वानखेडे यांनी केले. तसेच बैठकीत सामान्य प्रशासन विभाग हा विधी विशेष समितीशी संलग्न करण्याबाबत ठराव करण्यात आला. याशिवाय कन्झर्व्हन्सी लेन्स संदर्भातील प्रकरणाच्या सद्यस्थिती, न्यायालयाबाह्य तडजोड करण्यात येऊ शकणाऱ्या प्रकरणाबाबत आढावा घेण्यात आला. याशिवाय बैठकीत महानगरपालिकेच्या मालमत्ता,



सार्वजनिक रस्ते, आरक्षित जागा व अतिक्रमण संदर्भातील प्रलंबित कायदेशीर प्रकारण, शिकस्त इमारतीबाबत मनपातर्फे करण्यात येणाऱ्या कार्यवाही, सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती संदर्भातील प्रलंबित प्रकरणाचा आढवा, न्यायालयीन अथवा प्रशासकीय कारणामुळ प्रलंबित असलेल्या पदोन्नती प्रकरणाची संख्या, त्याची प्रशासकीय कारणामुळे प्रलंबित असलेल्या पदोन्नती प्रकरणाची संख्या त्याची सद्यस्थिती व त्यावर आवश्यक कार्यवाही बाबत समितीनेआढावा घेतला.

समितीच्या बैठकीत वरिष्ठ अधिवक्ते यांची नियुक्ती, निवड निकष, मानधन, जबाबदाऱ्या व प्रकरणांचे वाटप यासाठी प्रमाणित कार्यपद्धती तयार करणे, महानगरपालिकेच्या पॅनल अधिवक्त्यांची नियुक्ती, पात्रता, निवड प्रक्रिया, कार्यपद्धती, कामगिरीचे मूल्यमापन व पुनर्नियुक्ती यासाठी प्रमाणित कार्यपद्धती तयार करणे यावर चर्चा करण्यात आली. याशिवाय मनपाच्या विविध विभागाकडून प्राप्त कायदेशीर अभिप्राय आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या प्रस्तावावर विस्तृत चर्चा करण्यात आली. यावेळी विविध तडजोडी प्रकरणासाठी विधी सभापती यांनी स्थापत्य आणि विधी विभागाची संयुक्त बैठक बोलविण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. तर समिती सदस्यांनी वरिष्ठ अधिवक्ते यांना देण्यात येणारे खर्चाचे सादरीकरण पुढच्या बैठकीत ठेवण्याच्या सूचना केल्या.

# उर्वरित कामे लवकरात लवकर पूर्ण करा!

### महापौर निता ठाकरे यांनी घेतला विविध प्रकल्पांचा आढावा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकाद्वारा शहरात सुरू असलेल्या विविध प्रकल्पांचे उर्वरित कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, तसेच डीपीडीसीतील शासनाद्वारे निधी प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी दिले.

महापौर निता ठाकरे यांनी गुरुवारी (ता.२३) मनपा मुख्यालयातील महापौर सभाकक्षात मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेऊन शहरात सुरू असलेल्या विविध विकास प्रकल्पांची सद्यस्थिती तसेच प्रस्तावित विकास प्रकल्पांचा आढावा घेतला. याप्रसंगी स्थायी समिती सभापती श्रीमती शिवानी दाणी वखरे, मनपाच्या मुख्य अभियंता श्रीमती लीना उपाध्ये, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, अधीक्षक अभियंता अनिल गेडाम, प्रकल्प अभियंता राजीव गौतम, कार्यकारी अभियंता अल्पना पाटणे, कार्यकारी अभियंता अश्विनी येलचटवार प्रामुख्याने उपस्थित होते.

बैठकीत शहरातील उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे तसेच नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे निर्देश महापौरांनी अधिकाऱ्यांना दिले. यावेळी त्यांनी महिलांसाठी जयताळा येथे उभारण्यात येणाऱ्या वर्किंग वूमेस हॉस्टेलची उर्वरित कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश दिले. याशिवाय देवडिया हॉस्पिटल, मिनी माता रुग्णालय, श्री.लक्ष्मी नारायण शिव मंदिर संकुल, भांडेवाडी येथील श्वान दहनघाट, नंदग्राम प्रकल्प, विद्यार्थांसाठी उभारण्यात येणारी मोमिनपुरा ई-लॅब्ररी, मनपाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त करण्यात येणाऱ्या सौंदर्यीकरण बाबत सविस्तरपणे आढावा घेतला.

# नागरिकांना सेवा तात्काळ देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा!



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकातर्फे सार्वजनिक प्राधिकरणापासून नागरिकांना पुरविलेल्या सेवांच्या दर्जाचे मूल्यमापन करण्याबाबत राज्य सेवा हक्क आयोगाची महत्त्वाची बैठक नागपूर विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त संदीप देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मनपाच्या डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात पार पडली.

याप्रसंगी मनपाचे अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त निर्भय जैन, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, उपायुक्त मंगेश खवले, गणेश राठोड, अशोक घरटे यांच्यासह दहाही झोनचे सहायक आयुक्त व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### राज्य सेवा हक्क आयुक्तांचे आवाहन

बैठकीत मार्गदर्शन करताना संदीप देशमुख यांनी मनपाच्या अधिकाऱ्यांना मनपाद्वारे दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा सर्वसामान्य नागरिकांना पर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र सेवा हक्क आयोगाची संकल्पना माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आहे. मनपाची सर्व सामान्य नागरिकांशी जवळचा संबंध येतो. नागरिकांना सर्व सेवा तत्काळ आणि विहित कालावधीत उपलब्ध करून देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. त्यांनी सांगितले की, मनपा अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी सुद्धा कृत्रिम तंत्रज्ञानाचा वापर करावा आणि याचे प्रशिक्षण सुद्धा घ्यावे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ चे कलम क्रमांक १९ (१) अनुसार राज्य सेवा हक्क आयोग नागपूरकडून मनपाच्या लोकसेवा पुरविण्याच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. या बैठकीत मनपा अंतर्गत अधिसूचित लोकसेवे संबंधित सर्व झोन व केंद्रीय कार्यालयातील प्रथम अपिलीय अधिकारी आणि द्वितीय अपिलीय अधिकारी देखील उपस्थित होते.

याप्रसंगी उपायुक्त निर्भय जैन यांनी मनपातर्फे पुरविण्यात येणाऱ्या सेवांची माहिती राज्य सेवा हक्क आयुक्तांना दिली. त्यांनी सांगितले की, मनपातर्फे ६४ लोकसेवा ऑनलाईन स्वरुपात नागरिकांना पुरविल्या जात आहेत. यामध्ये जन्म मृत्यू दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नव्याने कर आकारणी, अग्निशमन ना हरकत दाखला देणे आणि मलनिःसारण जोडणी देणे प्रमुख आहे. तसेच २८ सेवा आपले सरकार पोर्टल वर उपलब्ध आहेत.

नागरिकांना सुलभ, पारदर्शक आणि वेळेवर सेवा देण्यासाठी मनपा कटिबद्ध आहे. बैठकीत सर्वप्रथम मनपा अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम यांनी संदीप देशमुख यांचे मनपाचा मानाचा दुपट्टा आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. निर्भय जैन यांनी विशेष कार्य अधिकारी कांबळे आणि श्याम कापसे यांनी ओंकार यांचे स्वागत केले. या प्रसंगी मनपा अधिकारी उपस्थित होते.

## उमरेड-भिवापूर राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे आठ दिवसात बुजवा!

### राष्ट्रवादी काँग्रेसचा आंदोलनाचा इशारा



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

उमरेड-भिवापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका निर्माण झाला असून वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित दादा) पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार संजय राठोड यांना निवेदन देऊन आठ दिवसांच्या आत रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अशोक गोंगल आणि शहराध्यक्ष तथा नगरसेवक नाजीम बेग यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, उमरेड-भिवापूर मार्गावर मोठ्या प्रमाणात खोल खड्डे पडले असून त्याचा फटका दररोज प्रवास करणाऱ्या नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि व्यापाऱ्यांना बसत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांचे अपघात वाढले असून अनेकांना दुखापत झाल्याच्या घटनाही घडत आहेत. मात्र, संबंधित यंत्रणेकडून रस्त्याच्या दुरुस्तीकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघाताचा धोका अधिक वाढत असून कोणतीही मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी तातडीने दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. येत्या आठ दिवसांत खड्डे बुजविण्याचे काम सुरू न झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. निवेदन सादर करताना नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष रुचीत पंजलवार आणि श्रीकांत बालपांडे उपस्थित होते.

# आमदार संजय पुराम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

### मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून सालेकसा तालुक्यातील नानव्हा रस्त्याच्या ६.५ कि.मी. कामास प्रशासकीय मंजुरी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजू फुंडे**

सालेकसा तालुक्यातील नानव्हा गावाला जोडणाऱ्या ६.५ किलोमीटर लांबीच्या अत्यंत महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाला अखेर मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. या मंजुरीमुळे अनेक वर्षांपासून खराब रस्त्यामुळे त्रस्त असलेल्या नानव्हा व परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, आमदार संजय पुराम यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश आल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

नानव्हा गावाकडे जाणारा हा रस्ता अनेक वर्षांपासून अत्यंत खराब अवस्थेत होता. विशेषतः पावसाळ्यात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल साचत असल्याने वाहतूक विस्कळीत होत असे. शेतकऱ्यांना शेतीमाल बाजारपेठेत नेण्यात अडचणी येत होत्या, विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात जाण्यास मोठा त्रास सहन करावा लागत होता, तर रुग्णांना वेळेवर उपचारासाठी रुग्णालयात पोहोचणेही कठीण होत होते.

ही गंभीर समस्या लक्षात घेऊन आमदार संजय पुराम यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. नानव्हा गावचे सरपंच गौरीशंकर बिसेन यांनीही ग्रामस्थांच्या वतीने वारंवार निवेदने देत रस्त्याच्या मंजुरीसाठी प्रयत्न केले. अखेर या संयुक्त प्रयत्नांना यश मिळाले असून ६.५ कि.मी. रस्त्याच्या बांधकामास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे.



या रस्त्याच्या निर्मितीमुळे नानव्हा गावासह परिसरातील ८ ते १० गावांतील नागरिकांना थेट लाभ मिळणार आहे. शेतीमालाची वाहतूक अधिक सुलभ होईल, विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित बनेल, रुग्णांना तातडीने आरोग्यसेवा उपलब्ध होईल आणि ग्रामीण भागाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला नवी गती मिळेल. भविष्यात या मागार्मुळे व्यापार, दळणवळण आणि शासकीय सेवांपर्यंत पोहोच अधिक सोपी होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

रस्त्याच्या मंजुरीची बातमी समोर येताच नानव्हा व परिसरातील ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करत आमदार संजय पुराम यांचे आभार मानले. लवकरच या कामाचे भूमिपूजन होणार असून प्रत्यक्ष कामालाही गती मिळणार असल्याची माहिती आमदार कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

**आमदार संजय पुराम म्हणाले,**

"नानव्हा रस्ता हा केवळ एका गावाचा नव्हे, तर संपूर्ण परिसराच्या विकासाचा महत्त्वाचा दुवा आहे. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून या रस्त्याला मंजुरी मिळाल्याने नागरिकांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली आहे. दर्जेदार आणि टिकाऊ रस्ता उभारून ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

**सरपंच गौरीशंकर बिसेन म्हणाले :**

"नानव्हा गावातील नागरिकांचे हे अनेक वर्षांचे स्वप्न आज पूर्ण होत आहे. आमदार संजय पुराम यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा महत्त्वाचा रस्ता मंजूर झाला. यामुळे गावाच्या विकासाला चालना मिळेल आणि नागरिकांचे दैनंदिन जीवन अधिक सुलभ होईल."

थोडक्यात

## पेपर लीक प्रकरणावरून केंद्र सरकारविरोधात वंचित बहुजन आघाडीचे निवेदन

### कलम ३५६ अंतर्गत सरकार बरखास्त करण्याची मागणी; आमगाव तहसीलदारांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

देशभरात सातत्याने होत असलेल्या पेपर लीकच्या घटना, वाढती बेरोजगारी तसेच विद्यार्थ्यांवरील कथित पोलिस लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडी, तालुका शाखा आमगावच्या वतीने राष्ट्रपती महोदयांना तहसीलदार आमगाव यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात भारतीय संविधानाच्या कलम ३५६ अंतर्गत केंद्र सरकार बरखास्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनानुसार, देशभरात आतापर्यंत १५० हून अधिक परीक्षांचे पेपर लीक झाल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परिणाम झाला आहे. पेपरफुटीच्या घटनांमुळे अनेक विद्यार्थी मानसिक तणावात गेल्याचे तसेच काहींनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, दिल्ली येथील जंतर-मंतर येथे पेपर लीक आणि विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाकडे केंद्र सरकारने दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांच्या मोर्चावर पोलिसांनी लाठीमार केल्याचा तसेच अनेक विद्यार्थी जखमी झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. वंचित बहुजन आघाडीने केंद्र सरकारवर संविधानिक आणि लोकशाही मूल्यांची पायमल्ली केल्याचा आरोप करत, विद्यार्थ्यांच्या हितासाठी व संविधान रक्षणासाठी राष्ट्रपतींनी हस्तक्षेप करून आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. या वेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष मंगळ गोंडाणे, जिल्हा उपाध्यक्ष प्यारेलाल जांभुलकर, तालुका महासचिव चंद्रकुमार मेश्राम, तालुका सचिव विजयजीत गणवीर, शहर अध्यक्ष चंद्रकुमार मेश्राम तसेच पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पत्रकार भावनात लोकमान्य टिळक जयंती



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इंग्रज सरकारविरुद्ध पत्रकारितेचा शस्त्रासारखा वापर करणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या १७० व्या जयंतीदिनी आज टिळक पत्रकार भवनात त्यांना आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी पत्रकार भवन ट्रस्टचे उपाध्यक्ष प्रभाकर दुपारे, व्यवस्थापक विनोद देशमुख, नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे उपाध्यक्ष अनंत मुळे, इलियास शेख, गोविंद खरेतिया, देवराव प्रधान यांच्यासह आदी पत्रकार उपस्थित होते.

## घुकशी येथे योगिराज हॉस्पीटलचे निशुल्क आरोग्य शिबिर संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी तालुक्यातील घुकशी येथे पावसाळ्यात होणारे आजार यापासून बचाव व्हावा करीता योगिराज हास्पीटल रामटेक यांच्या विद्यमाने गावातील नागरिकांना तसेच ग्रामीण भागातील गरीब आणि असुरक्षित कुटुंबांना उत्तम आरोग्य सेवा मिळवून देण्यासाठी व त्यांना सदैव आरोग्य लाभो व निरोगी रहावे या हेतूने गुरुवारी २३ जुलै रोजी निशुल्क आरोग्य तपासणी व निदान शिबीर घेण्यात आले.या शिबिरात खोकला, सर्दी, ताप, हिवताप, बीपी, सुगर, संसर्गजन्य रोग, वात, क्षयरोग, हर्निया, पोटाचे विकार, हायड्रोसील, किडनीस्टोन, गाठीचे आजार,मुळव्याध,हाडाचे आजार, त्वचा विकार,मणका विकार, यासारखे अनेक रोगांची तपासणी करुन निदान झाल्यानंतर निशुल्क औषधोपचार करण्यात आला. तर सततच्या उपचारासाठी निशुल्क औषधे सुद्धा वितरित करण्यात आले.तर गंभीर आजारांच्या तपासणी व उपचारासाठी हास्पीटल मध्ये सल्ला घ्यावा व आयुष्यमान भारत, महात्मा ज्यो.जन.आ. योजनेत समावेश असलेल्या आजारांवर निशुल्क सेवा प्रदान करण्यात येईल अशी सुचना आरोग्य तपासणी पथकाकडून देण्यात आली.

शिबिरात ८० पेक्षा अधिक रुग्णांनी आरोग्य तपासणी व उपचार याचा लाभ घेतला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य उमेश डडमल,विनोद डडमल,रुपाली डडमल,बेबी चौधरी, व सर्व ग्रा.पं.सदस्य यांच्या प्रयत्नातून शिबीर यशस्वी झाले. शिबिरात योगीराज हास्पीटल रामटेक चे तज्ञ वैद्यकीय पथक यामध्ये वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रशांत कटनकर, यांनी तपासणी केली तर जनसंपर्क अधिकारी अशोक अतकरे,औषधी वितरक दिव्या वाडिभस्मे,परिचारिका समिक्षा कांबळे,सोनु सोनवाने,सेजल निनावे,आशा सेविका पपीता राऊत यांनी सहकार्य केले.

# दिल्ली आंदोलनाचे बल्लारपूरात पडसाद

## महाविकास आघाडीचे धरणे आंदोलन, विद्यार्थी व तरूणांची हेळसांड करणारे शिक्षण व गृहमंत्री यांच्या राजीनाम्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

देशाची राजधानी दिल्ली येथे जंतर - मंतर व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासाजवळ आंदोलन करण्याची धार तीव्र झाली आहे. या आंदोलनाची धग देशभर पसरली आहे. याचे पडसाद आज गुरुवारी बल्लारपूर येथे उमटले. महाविकास आघाडीच्या वतीने येथील नगरपरिषद चौकातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ धरणे आंदोलन करुन देशाचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान व विद्यार्थी व तरुणांवर अमानुष हल्ला करण्यास कारणीभूत असणारे गृहमंत्री अमीत शहा यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

दिल्ली येथे महिनाभरापासून सीजेपी पक्षाच्या माध्यमातून



केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्र्याच्या राजीनामा घेण्यासाठी जंतर - मंतर वर आंदोलन केले जात आहे. या आंदोलनाची धार तीव्र करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुंग यांनी मागील चोवीस दिवसापासून आमरण उपोषण सुरु केले. अठराव्या दिवशी त्यांना दिल्ली पोलीस प्रशासनाने बळजबरी करत दवाखान्यात हलविले. मात्र देशातील विद्यार्थी व तरुणांनी हार मानली नाही.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या आंदोलनाची दखल घेतली नाही. परिणामी विद्यार्थी व तरुणांनी संसदेवर मोच्यार्ची हाक दिली. यासाठी देशभरातील विद्यार्थी व तरुण जंतर-मंतर येथून संसदेवर जात असताना अमानुषपणे विद्यार्थी व तरुणांवर लाठी चार्ज, अश्रू धुरांच्या नळकांड्याने हल्ला केला. यामध्ये शेकडोवर विद्यार्थी व तरुणांना जखमी व्हावे लागले.

देशातील विरोधी पक्ष नेते व इंडिया आघाडीचे नेत्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थाना अचानक धरणे आंदोलन केले. यावेळी विरोधी पक्ष नेते राहूल गांधी, प्रियंका गांधी, सपाचे नेते व माजी मुख्यमंत्री अखीलेश यादव यांच्यासह अनेक नेत्यांना अटक करण्यात आली. याचे पडसाद सर्वत्र उमटले. याच अनुषंगाने आज बल्लारपूर येथे केंद्र सरकारच्या दडपशाही धोरणाविरोधात धरणे आंदोलन महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केले. दुपारी १ वाजता पासून संध्याकाळी ४वाजता दरम्यान चाललेल्या धरणे आंदोलन नंतर सर्वांनी मोर्चा काढला.

> लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांच्या नेतृत्वात विरोधी पक्षांच्या नेत्यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासाजवळ धरणे आंदोलन केले. जंतर-मंतर येथील विद्यार्थी व तरुणांच्या आंदोलनाला नैतिक पाठबळ देण्यात आले.जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुंग यांच्या आमरण उपोषणाकडे केंद्र सरकारने दुर्लक्ष केले. यामुळे विद्यार्थी व तरुणांचा आक्रोश वाढला.याला कारणीभूत केंद्र सरकारचे धोरण आहे. विद्यार्थी व तरुणांना न्याय देण्याऐवजी सरकार दडपशाही करत आहे. आता राजकीय व सामाजिक परिवर्तनाच्या संघर्ष जोर धरत असून केंद्रातील मुजोर सरकार घालविण्याची वेळ आली आहे.
>
> **-सुभाष धोटे, अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण कांग्रेस कमिटी,चंद्रपूर**

आंदोलनकर्त्यांनी बल्लारपूर येथील तहसीलदार रेणुका कोकाटे यांच्या मार्फत राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना निवेदन सादर करुन शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान व गृहमंत्री अमीत शहा यांच्या राजीनाम्याची मागणी केली. निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात महाविकास आघाडीच्या जेष्ठ नेत्या डॉ. रजनी हजारे,शहर कांग्रेसचे अध्यक्ष अब्दुल करीम,शिवसेना उबाठाचे उपजिल्हा प्रमुख विनोदी ऊर्फ सिक्की यादव,नगराध्यक्ष डॉ.अलका अनिल वाढई,महाविकास आघाडीचे जेष्ठ नेते घनश्याम मुलचंदानी, गोविंदा उपरे, नगरपरिषद उपाध्यक्ष देवेंद्र आर्य, प्रकाश पाठक, भारत थुलकर,भास्कर माकोडे,अफसाना सय्यद, रोहित चुटे यांच्या स्वाक्षरीने निवेदन देण्यात आले.

# जिल्ह्याच्या नगराध्यक्षांचे नेतृत्व आता वाडीच्या नरेश चरडे यांच्या हाती!

### नगराध्यक्ष महासंघाच्या नागपूर जिल्हाध्यक्षपदी सर्वानुमते निवड, सचिवपदी कीर्ती बडोले

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

वाडी शहराच्या राजकीय व प्रशासकीय वाटचालीत अभिमानाची नोंद ठरणारी घटना म्हणजे वाडी नगर परिषदेचे नगराध्यक्ष नरेश चरडे यांची महाराष्ट्र नगराध्यक्ष महासंघाच्या नागपूर जिल्हाध्यक्षपदी सर्वानुमते निवड झाली आहे. जिल्ह्यातील सर्व नगर परिषदांचे नेतृत्व आता त्यांच्या हाती सोपविण्यात आल्याने वाडी शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे जिल्ह्यातील नगर परिषदांच्या प्रश्नांना अधिक सक्षमपणे व प्रभावीपणे शासन दरबारी न्याय मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.





नागपूर येथील रवीभवन येथे महाराष्ट्र नगराध्यक्ष महासंघाचे सचिव तथा नरखेडचे नगराध्यक्ष मनोज कोरडे यांच्या अध्यक्षतेखाली महासंघाची बैठक पार पडली. या बैठकीत नागपूर जिल्हा नगराध्यक्ष महासंघाच्या नवीन कार्यकारिणीची सवार्नुमते निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीत वाडीचे नगराध्यक्ष नरेश चरडे यांची जिल्हाध्यक्षपदी, रामटेकचे नगराध्यक्ष विवेक महाजन यांची उपाध्यक्षपदी, बेसा-पिंपळाच्या नगराध्यक्षा कीर्ती बडोले यांची सचिवपदी, तर खाप्याचे पीयूष बुरडे यांची खजिनदारपदी निवड करण्यात आली.

निवडीनंतर नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष नरेश चरडे यांनी जिल्ह्यातील सर्व नगर परिषदांमध्ये समन्वय साधून विकासकामांना गती देणे, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रलंबित प्रश्न शासन स्तरावर प्रभावीपणे मांडणे आणि नगर परिषदांना भेडसावणाऱ्या आर्थिक, प्रशासकीय व विकासकामांशी संबंधित अडचणी सोडविण्यासाठी महासंघाच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्याची ग्वाही दिली.

या बैठकीस बुटीबोरीचे सुमित मेंढे, कन्हानचे राजेंद्र शेंडे, पारशिवणीच्या सुनीता डोमके, मौदाच्या दर्शना ढोरे, कोंढाळीचे योगेश चाफले, हिंगण्याच्या लता गौतम, वानाडोंगरीच्या सुनंदा बागडे यांच्यासह जिल्ह्यातील विविध नगर परिषदांचे नगराध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नरेश चरडे यांच्या जिल्हाध्यक्षपदी झालेल्या निवडीमुळे वाडी शहराचा जिल्हास्तरावरील राजकीय व प्रशासकीय प्रभाव अधिक दृढ झाला असून, शहराच्या विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यांच्या या निवडीचे वाडी शहरासह संपूर्ण नागपूर जिल्ह्यातून स्वागत होत असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

## "विद्यार्थ्यांवर लाठी, लोकशाहीवर घाला"; नरखेडमध्ये काँग्रेसचा एल्गार

### धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी तहसीलवर धडक मोर्चा; केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी



**दै.सिंहवाणी वृत्त, नरखेड**

दिल्लीमध्ये विद्यार्थी व युवकांवर पोलिसांकडून झालेल्या कथित लाठीमाराच्या निषेधार्थ तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी नरखेड येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र निषेध मोर्चा काढण्यात आला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस ॲड. याज्ञवल्क्य जिचकार यांच्या नेतृत्वाखाली बसस्थानक ते तहसील कार्यालयापर्यंत निघालेल्या या मोर्चात शेकडो काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले. आंदोलनादरम्यान केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनावर पोलिसांनी केलेली कारवाई ही लोकशाही मूल्यांना काळिमा फासणारी असून, शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीमार करणे अत्यंत निषेधार्ह आहे, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर उत्तर देण्याऐवजी दडपशाहीचे धोरण अवलंबणाऱ्या केंद्र सरकारचा निषेध करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

मोर्चा तहसील कार्यालयावर पोहोचल्यानंतर झालेल्या सभेत ॲड. याज्ञवल्क्य जिचकार यांनी केंद्र सरकारवर टीका करत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली. त्यानंतर तहसीलदारांमार्फत राष्ट्रपती व पंतप्रधानांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी नरखेडचे माजी नगराध्यक्ष अनिल गजबे, नागपूर जिल्हा (ग्रामीण) युवक काँग्रेसचे अध्यक्ष मिथिलेश कन्हेरे, ठरवक जिल्हाध्यक्ष आयुष्य नवले, नरखेड नगर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नईम कुरेशी, ॲड. तेजस केने, मुकेश शेंडे, अजय ठाकरे, चंद्रशेखर राऊत, रवी काकडे, नितीन राय, गौरव पोतदार, भगवान ठोंबरे, करीम शेख, सुशील डोंगरे, ऋषिकेश पोद्दार, दीपिका डोंगरे, युवक काँग्रेसचे काटोल विधानसभा अध्यक्ष मंगेश रामदे, चिंटू राठोड, सुरज काकडे, प्रवीण राऊत, मनीष मेहंगाल, जयंत केने, सुरेंद्र वाघमारे, हरीश चरपे, चंद्रशेखर बारोकर, आर्यन नाखले यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ७३ प्रकरणांची नोंद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. गुरुवार (ता.२३)शोध पथकाने ७३ प्रकरणांची नोंद करून ३०,७०० रुपयाचा दंड वसूल केला. सार्वजनिक रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी/उघडयावर मलमुत्र विर्सजन करणे या अंतर्गत १ प्रकरणाची नोंद करून ५०० रूपयाची वसुली करण्यात आली. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४०० दंड) या अंतर्गत ५४ प्रकरणांची नोंद करून २१,६०० रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत ८ प्रकरणाची नोंद करून ८०० रूपयाची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत ३ प्रकरणाची नोंद करून १२०० रूपयाची वसुली करण्यात आली. दवाखाने,इस्पितळे, पॅथलॅब इत्यादींनी रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत १ प्रकरणाची नोंद करून २००० रूपयाची वसुली करण्यात आली. मॉल,उपहारगृहे,लॉजिंग,बोर्डिंगचे हॉटेल,सिनेमाहॉल,मंगल कार्यालये,कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे अशा प्रकरणांचाही समावेश आहे.

# ५ ऑगस्टपर्यंत पीक विमा द्या; अन्यथा नरखेड-काटोल ठप्प करू!

### क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा एल्गार; जिल्हाध्यक्ष सागर दुधाने आक्रमक, कृषी अधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांचा संताप उसळला

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

गेल्या दोन वर्षांपासून रखडलेल्या पीक विम्याच्या प्रश्नावरून नरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांचा संताप अखेर उफाळून आला आहे. मंगळवारी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली झालेल्या बैठकीत प्रशासनाला थेट इशारा देण्यात आला. ५ ऑगस्ट २०२६ पर्यंत सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विम्याची रक्कम जमा न झाल्यास नरखेड-काटोल परिसरात तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला.

बैठकीत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा शेतकरी पुत्र सागर दुधाने यांनी शासन, कृषी विभाग आणि संबंधित विमा कंपनीवर जोरदार हल्लाबोल केला. "गेल्या दोन वर्षांपासून शेतकऱ्यांना केवळ आश्वासनांचे गाजर दाखवले जात आहे. पीक विमा भरूनही शेतकऱ्यांच्या खात्यात एक रुपयाही जमा होत नाही. ही अन्नदात्याची उघड फसवणूक असून आता शेतकरी अन्याय सहन करणार नाही," असे त्यांनी ठणकावून सांगितले.

दुधाने यांनी प्रशासनाला अल्टिमेटम देताना स्पष्ट केले की, "५ ऑगस्टपर्यंत लेखी उत्तर, विमा वितरणाचे वेळापत्रक आणि प्रत्यक्ष विमा वाटप झाले नाही, तर नरखेड-काटोलमधील हजारो शेतकरी रस्त्यावर उतरतील. शेतमालाला योग्य भाव नाही, नैसर्गिक आपत्तीची भरपाई नाही, वेळेवर पीक विमा नाही. या अन्यायामुळे अनेक शेतकरी आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाले आहेत. विमा कंपनीकडे तब्बल ५७ कोटी रुपयांचा पीक विमा थकीत आहे. शासनाने दुर्लक्ष सुरूच ठेवले, तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील."

यावेळी प्रेम नारायणजी वैद्य यांनी सागर दुधाने यांच्या भूमिकेला जाहीर पाठिंबा देत, "प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पीक विमा मिळेपर्यंत संघर्ष सुरू राहील. तालुक्यातील सर्व शेतकरी एकजुटीने आंदोलनात उतरतील," असे स्पष्ट केले.



गुणेश्वर बंदे यांनी कृषी विभाग व विमा कंपनीवर तीव्र नाराजी व्यक्त करत, "काटोल-नरखेडमधील शेतकऱ्यांचा या यंत्रणांवरील विश्वास पूर्णपणे उडाला आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळू नये, अशीच त्यांची भूमिका दिसून येत आहे," असा आरोप केला.

सुभाषजी नरोलिया यांनी, "दोन वर्षांपासून शेतकऱ्यांना फक्त आश्वासनांची खैरात मिळत आहे. प्रत्यक्षात पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात विमा जमा झालेला नाही," अशी खंत व्यक्त केली.

तर बाबारावजी वाघमारे यांनी, "विमा कंपनी शेतकऱ्यांना विश्वासात न घेता मनमानी कारभार करत असून त्यामुळे हजारो शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे," असा आरोप केला.

बैठकीतील तीव्र चर्चेनंतर तालुका कृषी अधिकाऱ्यांनी ५ ऑगस्ट २०२६ पर्यंत सर्व पात्र शेतकऱ्यांची माहिती लेखी स्वरूपात सादर करून विमा वितरणाबाबत पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. मात्र या मुदतीनंतर कोणतीही दिरंगाई झाल्यास तीव्र आंदोलन अटळ असल्याचे क्रांतिकारी शेतकरी संघटनेने स्पष्ट केले.

बैठकीला सुभाषजी नरोलिया, बाबारावजी वाघमारे, प्रेम नारायणजी वैद्य, गुणेश्वर बंदे, नकुल लोहे, विनोद क्षीरसागर, सागर कावळे, मंगेश रामधे, पंकज निंबाळकर, विकास बंदे, हर्षल जाणे, अनिल लोकीया, शाहरुख शेख, उमेश नासरे, कुशन नासरे, अरुण पावडे, हेमंत बालपांडे, गणेश राऊत, विजय काकडे, प्रशांत हिरुडकर, रामेश्वर मस्के, प्रवीण कराले, प्रमोद कडू, प्रभाकर बारई, अंकित अरसदे, योगेश सातपुते, रामकृष्णजी काळबांडे, रेखाताई मेटागले यांच्यासह तालुक्यातील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# दिरंगाई नव्हे अन्यायच !

लीलाधर दवंडे
कामठी (नागपूर)

जूनच्या पहिल्या आठवड्यात केरळ राज्यातील एक आश्चर्य कारक बातमी वाचण्यात आली. सध्या वयाची साठ वर्षे पूर्ण केलेल्या आणि मातृभूमी इंग्लिश शाळेतील माजी शिक्षक अब्दुल माजीद यांनी पार्टटाईम ज्युनियर अरेबिक टीचर या पदासाठी २० वर्षांपूर्वी म्हणजे जवळपास २००५ मध्ये अर्ज सादर केला होता. मात्र, सध्या निवृत्त झालेल्या माजीद यांना आत्ता याबाबतचे नियुक्ती पत्र मिळाल्याने त्यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. त्यासोबत त्यांना याबाबत खंत सुद्धा वाटू लागली आहे. माजीद यांनी या पदासाठी पीएससी परीक्षा दिली होती. त्यात ते प्रतिक्षा यादीत होते.

आता प्रश्न पडतो की, जर माजीद संबंधित पदासाठी योग्य होते तर तब्बल वीस वर्षे त्यांना प्रतिक्षा का करावी लागली? आणि जर ते योग्य नव्हते तर इतक्या वर्षांनी त्यांना नियुक्ती पत्र पाठविणाऱ्यांना त्यांच्या वयाचा विसर कसा का पडला? एकंदर म्हणायचे झाल्यास साक्षरतेमध्ये अग्रेसर असलेल्या केरळ राज्यातील शैक्षणिक विभाग मात्र कुंभकर्णी झोपेत कामं करतात की काय? असा प्रश्न जर मनात उत्पन्न होत असेल तर तो चुकीचा ठरत नाही.

एकवेळ कोर्टाच्या बाबतीत तारीख पे तारीख समजू शकतो आणि त्यामुळे निरपराध्यास न्याय मिळण्यासाठी दिरंगाई होते हे सर्वज्ञात आहे. मात्र, जेव्हा एखादा शिक्षण विभाग जर अशा प्रकारची घोडचूक करत असेल तर देशातील विद्यार्थ्यांचे भविष्याचे काही खरे नाही, असेच समजावे लागेल. विशेष म्हणजे परीक्षा दिली त्यावेळी माजीद ३९ वर्षांचे होते आणि नियुक्तीपत्र हाती पडले तेव्हा त्यांनी आयुष्याची ६० वर्षे पूर्ण केली आहेत.

केरळ मधीलच दुसरे एक प्रकरण मन हेलावून टाकणारे आहे. स्तनाच्या कर्करोगासाठी जीवनरक्षक 'रिबोसिक्लिब' हे औषध परवडणाऱ्या दरात उपलब्ध व्हावे म्हणून एका कर्करुग्ण महिलेने २०२२ मध्ये दाखल केलेल्या याचिकेची २०२३ पासून अंतिम सुनावणीसाठी तब्बल ५७ वेळा नोंद झाली. मात्र, प्रत्यक्ष सुनावणी झाली नसल्याने बराच विलंब झाला आणि दरम्यान त्या कर्करुग्ण महिलेचा मृत्यू देखिल झाला. कर्करोग झपाट्याने पसरतो हे ज्ञात असूनही न्यायालयाने संबंधित याचिकेची दखल लवकरात लवकर घेतली असती तर कदाचित ती महिला अजून काही काळ नक्कीच जगली असती. मात्र, आपल्या देशात प्रत्येक कामात दिरंगाई ठरलेली असल्याने याचा त्रास सर्व सामान्य जनतेला वारंवार होतोय. आता याची कारणे बरीच असू शकतात.

न्याय देण्याबाबत दिरंगाई ठरणारे दुसरे एक प्रकरण नुकतेच रिसोड तालुक्यात पुढे आले. वाशिम न्यायालयाचे जिल्हा सत्र न्यायाधीश झपाटे यांनी नुकताच एक ऐतिहासिक निकाल दिला. ज्यामुळे पोलिस दलात एक मोठी खळबळ माजली आहे. रिसोड पोलिस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार महादेव धांडे यांच्यासह नऊ पोलिसांनी हिंगोली जिल्ह्यातील वाढोणा येथील पारधी बेड्यावर धाड टाकून बेग्या पवार या तरुणाला चोरीच्या एका गुन्ह्यात संशयित म्हणून अटक केली होती. गुन्ह्याची कबूली देण्यासाठी कोठडीत त्याला इतके मारण्यात आले की




शेवटी त्याने तुरुंगातच श्वास सोडला. यानंतर गुन्हे अन्वेषण विभागाकडून तपास करण्यात आला. याप्रकरणी न्यायालयाने ठाणेदार धांडेसह नऊ पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. आता याही प्रकरणी प्रश्न पडतो की, बेग्या पवार याचा गुन्हा नसतांना त्यास पोलिस कस्टडी देऊन मारहाण का करण्यात आली? तो पारधी समाजाचा होता म्हणून? की, खरा गुन्हेगार पोलिसांना गवसला नाही म्हणून? आणि जर बेग्या पवार गुन्हेगार होता.

तर, मग न्यायालयाने पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा का ठोठावली? या घडामोडीत सुद्धा न्यायासाठी बेग्या पवार याच्या आई वडिलांना तब्बल १५ वर्षे वाट बघावी लागली. या पंधरा वर्षांत संबंधित पोलिसांनी कित्येक निरपराध्यांना गुन्हेगार ठरवले असतील. कित्येकांना पोलिस कोठडीत नाहक मारले असेल. त्यामुळे इतक्या वर्षांनी मिळालेल्या न्यायला न्याय म्हणावा की दिरंगाई, हा विचार न्यायप्रणालीने नक्कीच करायला हवा. तिकडे गुजरात मधील एका शिक्षकाला मृत्यूनंतर सतरा वर्षांनी सेवेत सामावून घेण्याचा गुजरात न्यायालयाने दिलेला आदेश देखिल अशाच दिरंगाईचे ज्वलंत उदाहरण म्हणायचे.

अशा एक नव्हे कित्येक घटना आपल्या आसपास घडतात. जिथे अगदी आठ दहा दिवसांत किंवा महिन्यात काम व्हायला हवे. तिथे वर्षानुवर्षे लागून जातात. सरकारी काम आणि दहा महिने थांब, असे जे म्हटल्या जाते. ते काही खोटे नाही. मात्र, न्यायाच्या प्रतीक्षेत माणूस सरून जातो, त्याचे काय? कामगार न्यायालयात तर अशी कितीतरी प्रकरणे मिळतील. ज्यात न्यायाच्या प्रतिक्षेत कित्येक कामगारांनी जगाचा निरोप घेतलेला आहे.

उत्तर प्रदेशातील १९७७ साली घडलेल्या एका हत्याकांडाच्या नुकताच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात हत्याकांडातील आरोपींची तब्बल ४९ वर्षानंतर निर्दोष मुक्तता करणे म्हणजे न्याय ठरेल काय? सर्वोच्च न्यायालयाने पाचही आरोपींची निर्दोष मुक्तता जरी केली असली तरी, यातील दोघांनी केव्हाच या जगताचा निरोप घेतलेला आहे. त्यामुळे या न्यायाला किती उशीर झाला हे सर्वांना समजून येते. जर या प्रकरणाचा निकाल लवकर लागला असता तर निर्दोष सिद्ध झालेल्यांना सुखाचे जीवन जगता आले असते. पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथील चिमुरडीवर बलात्कार आणि निर्घृण हत्या प्रकरणी जर जलदगती न्याय देऊन आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे यास फाशी ठोठावल्या जाऊ शकते तर इतरांच्या बाबतीत हा न्याय मिळायला उशीर का? या न्यायात दिरंगाई का? या दिरंगाईला जबाबदार कोण? पोलिस यंत्रणा की न्याय प्रणाली?

कुठल्याही न्यायप्रणालीचा अपमान करण्याचा हेतू नाही. न्यायव्यवस्था आमच्यासाठी आदरणीय आहेत. मात्र, चोर सोडून संन्याशाला फाशी सारखे प्रकार जर वारंवार घडत असतील तर समाज सुधारणार नाही तर यातून अनेक गुन्हेगारांची निर्मिती होऊ लागेल. त्यातल्या त्यात फक्त न्याय प्रणालीतच नव्हे तर प्रत्येक शासकीय कार्यालयांत जनतेची कामे अशीच वेळ निघून गेल्यावर होत असतील तर, त्याचा फायदा कितपत होतो, याचाही विचार करणे गरजेचे आहे.

- ८४१२८७७२२०

# महान क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद


रमेश लांजेवार
नागपूर

भारताच्या स्वतंत्र संग्रामामध्ये अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व आपले संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले. यामध्ये प्रामुख्याने क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांचे नाव मोठ्या अभिमानाने आजही घेतले जाते. त्याचप्रमाणे अल्पवयात देशासाठी लढा उभारणारे महान क्रांतिकारक म्हणून चंद्रशेखर आझाद यांची ख्याती आहे. चंद्रशेखर आझाद यांचा जन्म २३ जुलै १९०६ ला मध्यप्रदेशातील झाबुआ (अलिराजपूर) जिल्ह्यातील भावरा या गावी झाला. जन्मताच त्यांच्या हृदयात क्रांतिची जोत लखलखत होती.त्यांचे प्राथमिक शिक्षण भावरा या गावात झाले.परंतु आईच्या इच्छेनुसार ते वाराणसी येथील संस्कृत पाठशाळेत शिकत असताना सुद्धा त्यांच्यात क्रांतीची ज्वाला धकधकत होती. चंद्रशेखर आझाद यांचे बालपण भिल्ल जमातीच्या वस्तीत गेले त्यामुळे ते धनुष्य बाण उत्तम रीतीने चालवत म्हणजेच त्यांच्यात बालपणापासून लढवय्य व क्रांतिकारक वृत्ती होती.

१३ एप्रिल १९१९ रोजी झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांड घटनेचा चंद्रशेखर आझाद यांच्या मनावर चांगलाच परिणाम झाला व तळपायाची आग मस्तकात गेली.त्यानंतर चंद्रशेखर आझाद १९२० मध्ये महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील असहकार चळवळीचा एक भाग बनले आणि वयाच्या १५ व्या वर्षी त्यांना अटकही झाली.अशा परिस्थितीत ब्रिटन न्यायालयाने या छोट्याशा मुलाला १२ फटक्यांची अमानुष शिक्षा दिली. चंद्रशेखर आझाद यांचे मुळ नाव चंद्रशेखर सीताराम तिवारी होते.परंतु बालवयातील अमानुष शिक्षा पहाता ब्रिटिश न्यायालयात नाव नोंदविताना आपले आडनाव आझाद असल्याचे नोंदविले. तेव्हापासुन संपूर्ण हिंदुस्थानात चंद्रशेखर आझाद नावाने ओळखले जाऊ लागले. फटक्यांनी आझादांच्या मनात क्षोभ वाढुन तळपायाची आग मस्तकात गेली आणि त्याच क्षणी त्यांचा अहिंसेवरील विश्वास उडाला व क्रांतीची ज्वाला प्रगट झाली आणि क्रांतिकारक झाले. आझाद यांचा क्रांतीकारी हेतू पहाता १९२२ साली महात्मा गांधीनी आझाद यांना असहकार चळवळीतून काढून टाकले. त्याचे आझाद यांना खुप वाईट वाटले. अशा परिस्थितीत त्यांनी गुलामगिरीत असलेल्या भारताला स्वातंत्र्य करण्याची शपथ घेतली.पुढे त्यांची भेट हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनचे संस्थापक राम प्रसाद बिस्मिल यांच्याशी झाली व क्रांतीची ज्योत आणखी प्रज्वलित झाली.

क्रांतीची ज्वाला संपूर्ण भारतात पसरविण्याच्या दृष्टीने मातृभूमीच्या रक्षणार्थ अनेकांना आंदोलनात सहभागी होण्यास प्रेरित केले.इंग्रजांना आर्थिक दृष्ट्या कमजोर करण्याच्या हेतूने व क्रांतिकारकांची भिती इंग्रजांमध्ये निर्माण व्हावी या उद्देशाने आझाद यांनी आपल्या बळावर काकोरी ट्रेन लुटली आणि व्हाइसरॉयच्या ट्रेनला उडविण्याचा देखील प्रयत्न केला.इंग्रजांच्या असेम्ब्लीत बॉम्ब फोडण्याच्या घटनेत चंद्रशेखर आझाद यांनी भगतसिंग यांना पुरेपूर मदत केली. चंद्रशेखर आझाद हे भगतसिंग यांचे मुख्य सल्लागार होते. भगतसिंग यांना अटक झाल्यानंतर त्यांना सोडविण्यासाठी देखील आझाद यांनी भरपूर प्रयत्न केलेत. अशा परिस्थितीत इंग्रजांना नेहमी प्रमाणे चकमा देतच होते. दिनांक २७ फेब्रुवारी १९३१ रोजी अलाहाबाद मधील अल्फ्रेड पार्क येथे राजगुरू हे जेलमध्ये असतांना त्यांच्या आईला आर्थिक मदत व्हावी यासाठी ते एका क्रांतिकारक सहकाऱ्याला भेटण्यासाठी गेले असता, एका अज्ञात खबऱ्याने इंग्रजांना चंद्रशेखर आझाद असल्याची वार्ता दिली आणि मोठा घात झाला.इंग्रजांना वार्ता मिळताच मैदानाला वेढा घातला.

अशा परिस्थितीत चंद्रशेखर आझाद व इंग्रज सैन्य यांच्यात मोठा गोळीबार झाला.



अशावेळी आझाद यांनी तीन इंग्रजांना धाराशाही केले. आपल्या जवळच्या गोळ्या संपत आहे हे त्यांच्या लक्षात आले.अशा परिस्थितीत त्यांना इंग्रजांच्या हातुन मरने पसंत नव्हते शेवटच्या गोळीने स्वतःला मारून घेतले आणि क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद देशांच्या स्वतंत्र लढ्यासाठी शहीद झाले. भारत स्वतंत्र होण्यासाठी ज्यांनी कशाचीही पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली अशांमध्ये आघाडीवर घेतले जाणारे नाव म्हणजे क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी अल्पवयात आपल्या प्राणांची आहुती दिली व देश स्वतंत्र झाला. त्यामुळे त्यांच्या बलिदानाची पावती आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी देणे गरजेचे आहे. देशातील राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की देश स्वतंत्र करण्यासाठी क्रांतिकारकांनी घरदार सोडून, घरांवर तुळशीपत्र ठेवून, आपला परिवार सोडून आणि आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली.त्यांची पुर्तता करण्याचे काम आज राजकीय पुढाऱ्यांचे आहे.कारण देशातील जनता सुखी- समृध्दी आणि समाधानी रहावी म्हणून देश स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी लढा उभारला होता.

आता देश स्वतंत्र झाला आहे तरी देशात बेरोजगारी, भुकमरी, महागडे शिक्षण, भ्रष्टाचार, पेपर फुटी,रोजगार या सर्वांचा सामना गरीब व सर्वसामान्यांना आणि विद्यार्थ्यांना करावा लागतो आहे. आज १४५ करोड लोकसंख्येच्या देशात करोडोंची संपत्ती आहे यात दुमत नाही. परंतु मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी (आजी-माजी आमदार - खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधी) देशांच्या करोडोंच्या संपत्तीवर आपली पकड मजबूत करून ठेवली आहे. यामुळे हा पैसा १४५ कोटी जनतेपर्यंत पोहचत नाही.यामुळे आर्थिक उलाढाल खोळंबत आहे व यातुनच देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण होतांना दिसतात व याचा फटका सरळ सर्वसामान्य, शेतकरी व गरीब लोकांना भोगावा लागत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस गरीब हा गरीब होत आहे तर श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांना माझी विनंती आहे की क्रांतिकारकांनी आपले बलिदान दिले,आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले त्याचा फायदा शेतकरी,गरीब व सर्वसामान्यांना व्हावा या उद्देशाने कार्य केले पाहिजे. त्याचबरोबर राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने कमविलेली संपूर्ण संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करून देशाच्या व सर्वसामान्यांच्या विकासासाठी हातभार लावला पाहिजे. तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांकडुन क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल.त्याचप्रमाणे देशात वाढते प्रदुषण पहाता क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवेत. यामुळे संपूर्ण देशात वातावरण प्रफुल्लित राहील व ऑक्सिजनची मात्रा वाढेल आणि मुख्यत्वेकरून या दिवशी केलेले वृक्षारोपण अनंत काळापर्यंत आपल्याला ग्यात राहिल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व मुळांमध्ये आपल्याला क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांची क्रांतीची ज्वाला धकधकतांना दिसेल. क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना कोटी-कोटी प्रणाम.जय हिंद!

- ९९२१६९०७७९

# ज्याचा मेंदू बिघडला, तो वेडा झालाच?

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

सन २०१४मध्ये प्रथमच २२ जुलै रोजी जागतिक मेंदू दिन साजरा करण्यात आला. मेंदू हा मानवी शरीराचा सर्वात महत्वाचा भाग आहे. शरीरातील सर्वप्राण्यांच्या शरीरातील एक गुंतागुंतीचा अवयव कामांवर नियंत्रण ठेवण्याबरोबरच विचार करणे, निर्णय घेणे, लक्षात ठेवणे आणि आठवण करणे यासारख्या महत्त्वाच्या कार्यांसाठी ते जबाबदार असते. दि.२२ जुलै रोजी जागतिक मेंदू दिन साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश हा आहे, की लोकांना मेंदूशी संबंधित सर्व आजारांची माहिती व्हावी. जागतिक मेंदू दिन दरवर्षी साजरा केला जातो. मेंदूशी संबंधित सर्व आजारांबद्दल लोकांना जागरूक करणे, हा या दिवसाचा उद्देश आहे. हा दिवस पहिल्यांदा सन २०१४मध्ये साजरा करण्यात आला. दरवर्षी या दिवसासाठी वेगळी थीम ठरवली जाते आणि मेंदूशी संबंधित आजारांबाबत लोकांना जागरूक करण्यासाठी या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. जागतिक मेंदू दिनाचा इतिहास असा की, सन २०१३मध्ये वर्ल्ड काँग्रेस ऑफ न्यूरोलॉजीच्या सार्वजनिक जागरुकता आणि वकिल समितीने जगभरात मेंदूच्या समस्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन जागतिक मेंदू दिन साजरा करण्याचा प्रस्ताव दिला. यानंतर वर्ल्ड फेडरेशन ऑफ न्यूरोलॉजी आणि इंटरनॅशनल हेडके सोसायटीतर्फे प्रथमच जागतिक मेंदू दिन साजरा करण्यात आला. त्या वर्षीची थीम होती एपिलेप्सी.

मेंदू निरोगी ठेवण्याचे उपाय- प्रतिकारशक्ती मजबूत ठेवणे, मेंदूला निरोगी ठेवण्यासाठी रोगप्रतिकारशक्ती मजबूत ठेवणे गरजेचे आहे, जेणेकरून आपले शरीर पुन्हा पुन्हा आजारी पडणार नाही. खरं तर, जेव्हा आपण वारंवार शारीरिक आजारी पडतो, तेव्हा आपल्या मनावरही त्याचा परिणाम होतो. अशा परिस्थितीत मेंदूची कार्यक्षमता आणि उत्पादकता प्रभावित होते. त्यामुळे शरीर निरोगी ठेवण्यासाठी आहारात निरोगी जीवनशैली आणि अन्नाचा समावेश करावा. योगासने आणि ध्यान नियमितपणे करावे, मन निरोगी ठेवण्यासाठी ते तणावमुक्त ठेवणे महत्त्वाचे आहे. यासाठी नियमितपणे योगासने आणि ध्यान करावे. योग आपल्या शरीराला तंदुरुस्त ठेवण्यास मदत करेल, तर ध्यान मनातील गोंधळ शांत करेल. त्यासोबत फिरता येते. पुरेशी झोप घ्यावी, झोपेच्या कमतरतेचा आपल्या मेंदूवरही परिणाम होतो. त्यामुळे आपली झोप रुटीन करावी आणि आठ तासांची झोप नियमित घ्यावी. हे पदार्थ टाळावेत, अन्नाचा आपल्या मेंदूवरही परिणाम होतो. अशा परिस्थितीत दारू, सिगारेट, तंबाखू, फास्ट फूड, जंक फूड इत्यादीपासून दूर रहावे. अक्रोड, बदाम, फ्लेक्ससीड्स, भोपळ्याच्या बिया इत्यादींना आपल्या आहाराचा भाग बनवावा.

**मानवी मेंदूत मज्जासंस्थेचा विकास-** सहा आठवडे वयाच्या गभार्चा मेंदू एक गुंतागुंतीच्या व क्रमबद्ध पायऱ्यांनी विकसित होतो. हे आकार बदलते मज्जासंस्थेच्या अगदी सुरुवातीस प्रारंभिक भ्रूणीय अवस्थांमधील एक साध्या सूजाने. क्षेत्र आणि कनेक्शनच्या जटिल सरचा न्यूरॉन्स स्टेम पेशी असलेल्या विशेष क्षेत्रामध्ये बनविल्या जातात आणि नंतर त्यांच्या अंतिम स्थानांवर पोहचण्यासाठी ऊतकांमधून स्थलांतर करतात. एकदा न्यूरॉन्स स्वतःवर स्थायिक झाल्यानंतर त्यांचे आकुंचने उडू शकते आणि मस्तिष्क, शाखाप्रमाणे आणि ते जाताना विस्तारत असतात. जोपर्यंत टिपा त्यांच्या लक्ष्यांवर पोहोचत नाहीत आणि ज्यातून सिंकॅप्टिक कनेक्शन बनतात. मज्जासंस्थेच्या अनेक भागांमध्ये सुरुवातीच्या अवस्थेत न्यूरॉन्स आणि सिन्प्सेसचे जास्त प्रमाणात उत्पादन केले जाते आणि नंतर अनावश्यक वस्तू काढून टाकल्या जातात. व्हर्टिब्रेट्ससाठी मज्जासंस्थेच्या विकासाच्या पहिल्या टप्प्यात सर्व प्रजातींमध्ये समान असतात. जसे की भ्रूण कोबळेच्या एका गोल धड्यात एक व्हर्मक्लाइक्स संरचना बनतात. त्याप्रमाणे पाठीच्या मध्यभागावर चालणाऱ्या क्टोडर्मची संकुचित पट्टी न्यूरल प्लेट बनण्यास प्रेरित करते, ही नर्व्हस सिस्टमची नांदी होय. मज्जासंस्थेच्या प्लेटमध्ये मज्जासंस्थेच्या खोबणीसाठी अंतराळ होते आणि नंतर ओठ असलेल्या ओठ मज्जासंस्थेच्या नलिकेला जोडण्यासाठी विलीन होतात.

केंद्रांमध्ये द्रव-भरलेले व्हेंट्रिकल असलेल्या पेशींचे एक खोबरे दात समोरच्या बाजूस व्हेंट्रिकल्स आणि तीन फुटी दोरखंड तयार करण्यास प्रवृत्त होते. त्यात अग्रमहामंडळ, मध्यांतर आणि हिंदकबळीचा पूर्वकाल असतो. पुढच्या टप्प्यावर अग्रमस्त्री टेलिसेफेलन नावाच्या दोन पेशी ज्यामध्ये सेरेब्रल कॉर्टेक्स, बेसल गॅन्लिया आणि संबंधित स्ट्रक्चर असतात. डीनेसफेलन ज्यात थैमास आणि हायपोथालेमस असतात. त्याचवेळी मेन्टेन्फेलॉनमध्ये मेंदूचा पेशी आणि पानांचा समावेश असतो. आणि मायलेंसेफेलन ज्यामध्ये मेरुंडला ओब्लागेटा असेल त्यात अंतराची अवस्था येते. या प्रत्येक भागात ज्यात प्रजननक्षमता झोन आहेत, जिथे न्यूरॉन्स आणि ग्लियाल पेशी निर्माण होतात; परिणामी सेल नंतर स्थलांतर करतात, कधीकधी लांब अंतरासाठी त्यांच्या अंतिम स्थानांवर. न्यूरॉन एकदा अस्तित्वात असेल तर ते त्याच्या आजूबाजूच्या परिसरात डेंड्राइट्स आणि अशन्सऑनचे विस्तार करते. कारण ते सामान्यतः सेल बॉडीपासून फार दूर आहेत आणि विशिष्ट लक्ष्यापर्यंत पोहचण्याची आवश्यकता आहे, विशेषतः क्लिष्ट मार्गाने वाढतात.

वाढत्या अक्षतळावरील टीपमध्ये रासायनिक संवेदनांमधे असलेल्या वाढीच्या शंकूसारख्या प्रोटॉप्लाज्मचा एक फटका असतो. या रिसेप्टर्स स्थानिक पर्यावरणाचा अर्थ लावतात, ज्यामुळे वाढीच्या शंकुला विविध सेल्युलर घटकांद्वारे आकर्षित किंवा मागे हटले जाऊ शकते आणि अशा प्रकारे प्रत्येक पावलावर त्याच्या दिशेने एक विशिष्ट दिशेने धाव घेतली जाऊ शकते. या पाथफायंडिंग प्रक्रियेचा परिणाम हा आहे की वाढीच्या शंकूच्या मस्तिष्कापर्यंत ती पोहोचते, जोपर्यंत ते त्याच्या गंतव्य क्षेत्रापर्यंत पोहचत नाही. तेथे इतर रासायनिक संकेतांमुळे ते शिरोबिंदू निर्माण करण्यास सुरुवात करतात. संपूर्ण मेंदू लक्षात घेता हजारो जनुके उत्पादने तयार करतात. जे अँक्सोनल पाथफायंडिंगवर परिणाम करतात. शेवटी ज्या सिन्टेप्टिक नेटवर्क उगवले जातात ते फक्त जीन्सद्वारेच निर्धारित होतात.

आपल्या मेंदूच्या सक्रियतेसाठी काय करायला हवं? तर मेंदूला दीर्घ आणि सक्रिय आयुष्यासाठी सक्रिय राहणे आवश्यक आहे. तज्ज्ञांच्या मते, नियमित व्यायाम, संतुलित आहार, अल्कोहोल आणि तंबाखूपासून दूर राहणे, तणाव आणि चिंतेचे प्रमाण कमी ठेवणे, सामाजिकदृष्ट्या सक्रिय राहणे आणि सात ते आठ तासांची नियमित झोप यामुळे मेंदू सक्रिय राहण्यास मदत होते. मेंदूला सजग ठेवण्यासाठी त्याला कामात गुंतवून ठेवण्याची गरज आहे. मेंदूने आपण जितके जास्त काम करू तितका तो अधिक सतर्क राहील.

वृद्धांमध्ये मेंदूचे भान न राहणे, विसरण्याची सवय लागणे यासारख्या समस्या सुरू होतात. अशा समस्या टाळण्यासाठी, कोडे सोडवणे, ऑप्टिकल भ्रम समजून घेणे उपयुक्त ठरू शकते. अशा कामांमुळे मेंदूवर काम करण्याचा आणि सतर्क राहण्याचा दबाव येतो. भ्रमाच्या अवस्थेपासून वाचवण्यासाठी मानसिक तंदुरुस्ती उपयुक्त आहे. अशा प्रकारे घ्या मेंदूच्या आरोग्याची काळजी, पत्ते, कॅरम, बुद्धिबळ यांसारखे इनडोअर गेम्स मेंदूला सक्रिय करतात. त्याचप्रमाणे संगीत, कोडी, नृत्य, शब्दांची कोडी सोडवणे, ब्रेन टीझर हे मेंदूला सक्रिय ठेवण्याबरोबरच त्यासाठी व्यायामही करतात. मेंदू हा प्राण्यांच्या शरीरातील एक गुंतागुंतीचा अवयव आहे. हा अवयव डोक्यामध्ये कवटीच्या आत असतो.

- ९४२३७१४८८३